अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार, दि. २ सप्टेंबर २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : ३३४ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## मुख्यमंत्र्यांची जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा; अहवाल सादर

**सोलापूर** : दक्षिण सोलापूर औज येथे शुक्रवारी दुपारी घडलेल्या दुर्घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधत घडलेल्या दुर्घटनेची संपूर्ण माहिती घेतली. जिल्हा प्रशासनाने तात्काळ मदतीसाठी अहवाल पाठवला आहे.

शुक्रवारी दुपारी औज येथे गंभीर दुर्घटना घडली. त्यात एका शाळकरी मुलीसह ४ जणांना जीव गमवावा लागला. त्यावरून ग्रामस्थ आणि परिसरातील नागरिक चांगले संतापले आहेत. दरम्यान मुख्यमंत्री कार्यालयाकडून तातडीने याबाबत विचारणा करण्यात आली. शिवाय तत्काळ या प्रकरणाचा अहवाल देण्याच्याही सूचना करण्यात आल्या. निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांनी या प्रकरणाची माहिती घेण्यासाठी प्रांताधिकारी विठ्ठल उदमले आणि तहसीलदार किरण जमदाडे यांना घटनास्थळी पाचारण केले. अपर पोलीस आयुक्त हिम्मतराव जाधव हे देखील घटनास्थळी थांबून सर्व परिस्थिती नियंत्रणात आणली. घडलेल्या प्रकाराचा संपूर्ण अहवाल मुख्यमंत्री कार्यालयाकडे जिल्हा प्रशासनाने शुक्रवारी सायंकाळी पाठविला. मृतांच्या नातेवाईकांना मदत देण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडे याबाबतचे प्रस्ताव पाठविण्याच्या सूचनाही जिल्हा प्रशासनाला मुख्यमंत्री कार्यालयाने केल्या आहेत.

# सिमेंटचा बल्कर शाळेसह बस स्टॉपवर धडकला, शाळकरी मुलीसह चौघे चेंगरून जागीच ठार

## ▸▸ औज (आहेरवाडी) गावावर शोककळा ▸▸ चालकाचा ताबा सुटल्याने दुर्दैव ओढवले

सुराज्य/अक्कलकोट

**सोलापूर – काशीलिंग जेऊर रस्त्यावरील दक्षिण सोलापूर तालुक्याच्या औज (आहेरवाडी) गावातील मुख्य रस्त्याच्या वळणावर सिमेंट वाहतूक करणारा बल्कर अचानक पलटी झाला. त्यावेळी ही गाडी जिल्हा परिषद शाळेच्या गेटला पहिल्यांदा धडकली. त्यानंतर जवळच्याच बस स्टॉपवर जावून आदळली. या भीषण अपघातात बल्करखाली चेंगरून औज गावातील विठोबा कोडिंबा शिंगाडे (वय वर्षे ६५), याच गावातील शालेय विद्यार्थीनी प्रज्ञा बसवराज दोडतले (वय वर्षे ९, इयत्ता-तिसरी), मूळचे कर्जाळचे व सोलापूरस्थित महेश शशिकांत इंगळे (वय वर्षे १७,रा. नई जिंदगी ) व अनिल नामदेव चौधरी (वय वर्षे ५०, रा. दहिटणे ता. अक्कलकोट) हे चौघे जागीच ठार झाले तर यात काजल शिलेप्पा माशाळे (वय वर्षे ९ औज) व इरव्वा रावसाहेब बनसोडे (वय ५५,रा.बऱ्हाणपूर) हे दोघे जखमी झाले आहेत. शुक्रवारी दुपारी सव्वा बाराच्या सुमारास ही दुर्दैवी घटना घडली.**


महेश इंगळे


प्रज्ञा दोडतले


अनिल चौधरी


विठोबा शिंगाडे






या घटनेची सविस्तर माहिती अशी की, औज जिल्हा परिषद शाळेच्या कमानीच्या बाजूस असलेल्या बस स्टॉप येथे परगावी जाण्यासाठी लोक बसले होते.सिमेंट कारखान्यांच्या दिशेकडून कच्चे सिमेंट भरून बल्कर (एम. एच. ०४ एल ई ३०५३) ही गाडी सोलापूरच्या दिशेने चालली होती. बल्करचा चालक विलास डोंबाळे (राहणार लातूर) हा गाडी चालवत होता. बसस्टॉपजवळ आल्यानंतर त्याचा गाडीवरचा ताबा सुटला. गाडी वेगात होती. शाळेच्या कमानीला धडकून बल्कर पलटी झाला. त्याचवेळी शाळेतून बाहेर पडत असताना शाळेचे लोखंडी गेट मुलीच्या अंगावर पडल्याने प्रज्ञा बसवराज दोडतले ही मुलगी जागेवरच चेंगरून मरण पावली तर तिच्यासोबत खेळणारी दुसरी शाळेकरी मुलगी काजल शिलप्पा माशाळे ही गंभीर जखमी झाली. पुढे ही गाडी बस स्टॉपवर जावून आदळली. त्यावेळी महेश शशिकांत इंगळे, अनिल नामदेव चौधरी, विठोबा शिंगाडे या तिघांच्या अंगावरून ही गाडी गेल्याने तेही जागीच ठार झाले.

विठोबा शिंगाडे हा नेहमीप्रमाणे बसस्टॉपवर बसला होता. इंगळे, चौधरी व बनसोडे हे तिघेजण सोलापूरला जाण्यासाठी स्टॉपवर थांबले होते. इंगळे, चौधरी, शिंगाडे यांच्या अंगावरून ही गाडी गेली. काजल माशाळे हिच्यावर सोलापुरातील काटीकर हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. बनसोडे हिच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले.

मयताच्या वारसांना प्रत्येकी २५ लाख रुपये मिळावे व त्यांच्या घरातील एकाला त्यांच्या फॅक्टरीमध्ये कामास घ्यावे व सर्व सिमेंट फॅक्टरीच्या गाड्या ये-जा करण्यासाठी गावातून न येता बाहेरून जावे, या मागण्यासाठी औज गावातील संतप्त नागरिकांनी जवळपास दोन तास रास्ता रोको आंदोलन केले. चौघांचे मृतदेह भर उन्हात रस्त्यावर ठेवून सायंकाळपर्यंत ग्रामस्थांनी आंदोलन केले.

शेवटी पोलीस प्रशासनाच्या मध्यस्थीने व मुख्यमंत्री यांचे स्वयंसेवक यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा केली. मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येकी पाच लाख रुपये वारसदारांना देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतरच ग्रामस्थांनी आंदोलन मागे घेतले.

अपघात झाल्याचे कळताच ग्रामस्थ एकवटले. लागलीच त्यांनी मदतकार्य हाती घेतले. ३५ टनाची ही गाडी दोन क्रेन मागून बाजूला करण्यात आली. त्यानंतर गाडीखाली चिरडलेल्या मृत व्यक्तींना गॅस कटरने कट करून बाहेर काढण्यात आले. या भागांमध्ये मोठमोठ्या सिमेंट कंपन्या आहेत. त्यामुळे कायमच सिमेंट वाहतूक करणारे मोठी वाहने ये -जा करतात. औज गावाजवळ वळण असल्याने त्या ठिकाणी कोपऱ्यावर असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळेबाहेर बस स्टॉप आहे.

दुपारच्या दरम्यान काही विद्यार्थी आणि नागरिक त्या बस स्टॉप वर थांबले होते, दरम्यान या रस्त्यावरून एम. एच. ०४ एल.ई. ३०५३ हे सिमेंटचे मोठे वाहन जात होते. अचानक ते वाहन पलटी झाले. सदरचे वाहन बस स्टॉपवर पलटी झाल्याने बस स्टॉप वर थांबलेले नागरिक त्याखाली चेंगरल्याची माहिती आहे.

घटनास्थळी अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी, विलास यामावार, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती, वळसंग पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक अनिल सनगल्ले, मंद्रुप पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत हुले, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अमरसिंह गवारे, उपजिल्हाधिकारी विठ्ठल उदमले, बीडीओ बाळासाहेब वाघ, दक्षिणचे तहसीलदार किरण जमदाडे, जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी प्रसाद मिरकले यांच्यासह ग्रामीण पोलीस दलातील पोलीस कर्मचारी, महसूल, आरोग्य विभागाचे कर्मचारी यांनी घटनास्थळी भेट दिली.

### भेट अखेरची ठरली...

यातील मयत अनिल नामदेव चौधरी हा मूळचा अक्कलकोट तालुक्यातील दहिटणे गावचा आहे. काम करून उदरनिर्वाह भागवण्यासाठी गेल्या दहा ते पंधरा वर्षापासून सेंट्रींग कामाच्या निमित्ताने तो पुण्यात राहायला होता. दोन-चार दिवसांपूर्वी औज येथील त्यांच्या पाहुण्याकडे तो आला होता. शुक्रवारी पुण्याला जाण्यासाठी स्टॅण्डवर तो बसला होता. काळाने त्याच्यावर घाला घातला. त्याच्या पश्चात पत्नी, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे.

### अधिकाऱ्यांनी दाखवली सर्तकता

या गाडीत ३५ टन सिमेंट होते. रस्त्याच्या जवळच स्टॉप आणि शाळा आहे. या रस्त्यावरून जड वाहतूक केली जावू नये, अशी ग्रामस्थांची अनेक महिन्यांपासूनची मागणी आहे. या अगोदरही याच ठिकाणी अपघात होवून एक-दोन लोकांचा मृत्यू झाला होता. ग्रामस्थांच्या आंदोलनामुळे घटनास्थळी वातावरण तणावपूर्ण बनले होते. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, अप्पर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी आपल्या यंत्रणेला तत्काळ घटनास्थळी पाठवून परिस्थिती नियंत्रणात आणण्याची सूचना केली.

### चालकाला बेदम मारहाण...

गाडी पलटी झाल्यानंतर चालक डोंबाळे हा जखमी झाला. पण ग्रामस्थांनी भावनेच्या भरात त्याला ताब्यात घेतले व बेदम मारहाण केली. जखमी अवस्थेत त्याला सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## महाराष्ट्रावर पावसानंतर लोडशेडिंगचे संकट; रोज अर्धा ते दोन तासांचे लोडशेडिंग सुरू

सुराज्य/सोलापूर

कमी पडलेला पाऊस आणि वीजेची वाढलेला मागणी याचा फटका आता राज्याला बसणार असून राज्यावर लोडशेडिंगचे संकट घोंघावत आहे. महाराष्ट्राला आता लोडशेडिंगचा फटका बसणार असून मागणी वाढल्याने आणि तुटवडा निर्माण झाल्याने महाराष्ट्रात इमर्जन्सी लोडशेडिंग करण्यात येणार असल्याची



माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे राज्यातील नागरिकांनी आता रोज अर्धा तास ते दोन तासांच्या लोडशेडिंगला सामोरं जावं लागणार आहे.

राज्यात यंदा पावसाने दडी मारल्याचं दिसून आलं. त्यामुळे शेतीसाठी शेतकऱ्यांनी पाण्याचा उपसा वाढला आहे. याचा परिणाम हा विजेचा तुटवडा निर्माण होण्यावर होत आहे. त्यामुळे आपत्कालीन लोडशेडिंग करण्यात येत आहे. विजेची मागणी जशी वाढेल त्यानुसार हा लोडशेडिंग करण्यात येत आहे. कधी अर्धा तास, कधी एक तास तर कधी दीड तासांपर्यंत लोडशेडिंग करण्यात येत आहे. वाढीव मागणी कमी झाली किंवा पाऊस पडल्यास आल्यास लोडशेडिंग आपोआप बंद होईल असं महावितरणच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे.

## भारत-पाक आज सामना

**सोलापूर** : शनिवारी होणाऱ्या भारत आणि पाकिस्तान यांच्यातील हाय होल्टेज सामन्यात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. रंगतदार सामना पल्लेकेले स्टेडियममध्ये पार पडणार आहे. बाबर आझमच्या नेतृत्वातील पाकिस्तान संघाने आशिया चषकाची सुरुवात दणक्यात केली आहे. पाकिस्तानने पहिल्याच सामन्यात नेपाळचा २३८ धावांचा पराभव केला. या विजयामुळे पाकिस्तानचा आत्मविश्वास वाढलेला असेल. पण भारतीय संघही दमदार फॉर्मात आहे.

### दोन महिन्यांच्या पगारीसाठी पाहिजेत २२ कोटी; मिळाले ५ कोटी

## महसूल कर्मचाऱ्यांचा पगार नाही, आंदोलनाचा इशारा

सुराज्य/सोलापूर

महसुल विभागातील अधिकारी कर्मचारी गेल्या दोन महिन्या पासून पगारीपासून वंचित आहेत. दोन महिन्याच्या पगारीसाठी तब्बल २२ कोटी गरज असताना विभागिय आयुक्त पातळीवरून जिल्हाप्रशासनास फक्त ५ कोटी रूपये प्राप्त झाले आहेत. त्यामुळे पाच कोटीत दोन महिन्याचे वेतन कसे आदा करायचे हा प्रश्‍न जिल्हाप्रशासना समोर आहे. वेतना अभावी घरचे अर्थचक्र बिघडले असल्याने कर्मचारी संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलनाचा इशारा देत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे.

महसुल विभागातील जुलै अन् ऑगस्ट या दोन महिन्यांचे वेतन मिळालेले नाही. नायब तहसीलदार, अव्वल कारकून, लिपिक, शिपाई, अधिकारी असे जवळ पास दिड एक हजार कर्मचारी वेतना झाले नाही परिणामी अनेकांचे घरभाडे अन् बँकेचे हप्ते थकले आहेत.

चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना घराचे बजेट कोलमडले आहे. घर चालवण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे. बँकेच्या हप्त्यांसाठी कर्मचारी पतसंस्थेकडे तातडीच्या कर्जासाठी अनेकांची अर्ज केले आहे.दोन महिन्याच्या वेतना साठी २२ कोटी गरज आहे. मात्र ५ कोटी प्रशासनास प्राप्त झाले आहे. त्यामुळे वेतन करताना प्रशासनास अडचणी येत आहेत. मात्र इकडे कर्मचारी संघटना आक्रमक झाली आहे, महसूल कर्मचारी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष शंतनू गायकवाड यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. पहिल्या टप्प्यात काळ्या फिती लावून काम करणे, सुट्टीच्या वेळेत ठिय्या आंदोलन तर ७ सप्टेंबरपासून बेमुदत लेखनी बंद आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. या बाबतचे निवेदन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना दिले आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आपला विकास कोण करणार? यासाठी ते भांडताहेत!

कल्याण
559-99-289

मुंबई
400-47-250

# मराठा उपोषणकर्त्यांवर लाठीचार्ज; आवरण्यासाठी हवेत गोळीबार

सुराज्य/जालना

**जालना जिल्ह्यातील अंतवरली सराटी गावामध्ये पोलीस आणि आंदोलकांमध्ये रेटारेटी झाली आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषण सुरू होते. त्या ठिकाणी पोलिसांनी लाठीचार्ज केला. उपोषण करणाऱ्या आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. आक्रमक झालेल्या आंदोलकांना आवरण्यासाठी पोलिसांनी हवेत गोळीबार केला. आंदोलनकर्त्यांनी पोलिसांवर दगडफेक केल्याचे पोलिसांनी सांगितले.**

या घटनेचे तीव्र पडसाद उमटण्याची शक्यता आहे. या घटनेनंतर जिल्ह्यात तणावाची स्थिती आहे. घटनास्थळी दगडांचा खचही असल्याचे दिसून आले आहे. उपोषण आंदोलन चिरडण्यासाठी पोलिसांनी केलेल्या कारवाईविरोधात राज्यभरात संताप व्यक्त करण्यात येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वड्डेटीवार यांनी या लाठी हल्ल्याचा निषेध केला आहे.

२९ ऑगस्टपासून मराठा मोर्चा समन्वयक मनोज जरांगे यांच्यासह १० जण आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलनाला बसले आहेत. त्यांच्या समर्थनासाठी अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. उपोषणकर्त्या आंदोलकांची प्रकृती खालावण्याची भीती निर्माण झाली होती.

त्यामुळे उपोषण आंदोलन चिघळू नये यासाठी पोलिसांकडून उपोषण करणाऱ्या आंदोलकांना ताब्यात घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्याला आंदोलकांनी विरोध केला.

त्यानंतर दोन्ही बाजूने रेटारेटी झाली. पोलिसांनी लाठीचार्ज करण्यात आला. तर, आंदोलकांकडून दगडफेक करण्यात आल्याची माहिती आहे. आक्रमक झालेल्या आंदोलकांना आवरण्यासाठी पोलिसांनी हवेत गोळीबार केला आणि लाठीचार्ज केला.



# हेतू साध्य झाला का?

तमिळनाडूतील एका विवाहाच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वाचा निकाला दिला आहे. आपला जोडीदार निवडण्याचा मूलभूत अधिकार सर्वांना आहे, असे न्यायालयाने पुन्हा एकदा स्पष्ट केले. सेल्फ-रिस्पेक्ट मॅरेज म्हणजेच स्वाभिमान विवाह. तमिळनाडूतील सुधारित हिंदू विवाह कायद्यानुसार विवाहासाठी कोणत्याही सार्वजनिक किंवा जाहीर सोहळ्याची आवश्यकता नाही. कोणत्याही सज्ञान दोन व्यक्ती पुजारी किंवा पुरोहिताच्या उपस्थितीशिवाय स्वत:ला विवाहित घोषित करू शकतात तसेच वकीलही दोन प्रौढ व्यक्तींमध्ये परस्पर संमतीने 'सुयमरियाथाई' (सेल्फ-रिस्पेक्ट मॅरेज म्हणजेच स्वाभिमान विवाह) विवाह लावू शकतात, असा महत्त्वपूर्ण निर्णय न्यायालयाने सोमवारी (२९ ऑगस्ट) रोजी एका याचिकेसंदर्भात दिला. मद्रास उच्च न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध इलावरसन या तरुणाने केलेल्या अपिलावर सर्वोच्च न्यायालयाने वरील निर्णय दिला. इलावरसन याने स्वाभिमान विवाह केला होता. मात्र, हा विवाह अमान्य करत त्याच्या पत्नीला तिच्या पालकांनी बेकायदा त्यांच्या ताब्यात ठेवल्याचा दावा इलावरसनने केला होता. तिच्या सुटकेसाठी त्याने वकील अथनम वेलनच्या मदतीने मद्रास उच्च न्यायालयात हेबियस कॉर्पस् याचिका केली होती. उच्च न्यायालयाने वकिलांच्या कार्यालयात केले जाणारे विवाह हिंदू विवाह कायदा, १९५५ नुसार वैध नसल्याचा निर्वाळा दिला. इलावरसनचा विवाह स्वाभिमान विवाह असला तरी त्याची कायद्यानुसार नोंदणी करणे आवश्यक होते तसेच हा विवाह एका वकिलाच्या कार्यालयात झाला. कोणतेही वकील त्यांच्या कार्यालयात असे विवाह लावू शकत नाहीत, असे सांगत उच्च न्यायालयाने याचिका फेटाळली होती. एवढेच नाही तर 'बनावट विवाह प्रमाणपत्रे' देणाऱ्या वकिलांवर बार कौन्सिलने शिस्तभंगाची कारवाई करावी, असे निर्देशही उच्च न्यायालयाने दिले होते. या निर्णयामुळे नाराज



होऊन याचिकाकर्त्याने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. न्यायमूर्ती एस. रवींद्र भट्ट आणि न्यायमूर्ती अरविंद कुमार यांच्या खंडपीठाने मद्रास उच्च न्यायालयाचा निर्णय रद्द केला तसेच खंडपीठाने याचिकेला परवानगी दिली. इलावरसनच्या विवाहावेळी उपस्थित वकील त्यांच्या व्यावसायिक क्षमतेनुसार न्यायालयाचे अधिकारी म्हणून काम करत नव्हते, तर या जोडप्याला वैयक्तिकरीत्या ओळखत असल्यामुळे ते कायद्याच्या कलम ७ (ए) नुसार कारवाई करत होते. या कलमानुसार, दोन हिंदू त्यांचे मित्र, नातेवाईक किंवा इतर व्यक्तींच्या उपस्थितीत पारंपरिक विधी न पाळता किंवा पुजाऱ्याशिवाय, सोहळ्याशिवाय विवाह करू शकतात. जो विवाह कोणत्याही पुजारी, ब्राह्मण, अग्नी आणि मंत्रोच्चारांशिवाय होतो त्याला स्वाभिमान विवाह म्हणतात. पुजारी, अग्नी, सात फेरे, मंगळसूत्र, कन्यादान इत्यादी सामान्य हिंदू विवाहसोहळ्यांमध्ये आढळणाऱ्या प्रथा-परंपरा या विवाहात नसतात. या लग्नात वधू-वर त्यांच्या घरी कुटुंबातील वडीलधारी मंडळी किंवा कुटुंबातील इतर सदस्य वा मित्रांसमोर लग्न करतो. या विवाहाचा उद्देश असमान, अन्यायकारक असलेल्या ब्राह्मणी प्रथा आणि परंपरा समाजातून काढून टाकणे तसेच जातीयवाद नष्ट करणे हा आहे. तमिळनाडूमध्ये स्वाभिमान विवाहाला मान्यता आहे. तेथे १९२५ मध्ये एस. रामनाथन यांनी ई. व्ही. रामास्वामी (पेरियार) यांना तमिळनाडूमधील जातीयवादाविरोधात चळवळीचे नेतृत्व करण्यासाठी प्रोत्साहित केले. पेरियार यांनी स्वाभिमान चळवळ सुरू केली. जातीयवाद असलेल्या समाजात मागास जातींना स्वाभिमान राखण्यासाठी प्रोत्साहित करणे हा त्याचा उद्देश होता. स्वाभिमान लग्नाची संकल्पना फक्त दक्षिणेतच आहे. १९६८ मध्ये हिंदू विवाह (तमिळनाडू दुरुस्ती) कायद्याद्वारे तमिळनाडूमध्ये स्वाभिमान विवाहांना कायदेशीर मान्यता मिळाली आहे. इतके प्रयत्न होऊनही आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना तमिळनाडूमध्ये हिंसाचारापासून मुक्तता मिळालेली नाही. ज्यांनी हे पाऊल टाकले, त्यांचा हेतू साध्य झाला का? हा प्रश्न तितकाच महत्त्वाचा आहे. सप्तपदी झाल्याखेरीज विवाहाला मान्यता देता येणार नाही, या काही वर्षांपूर्वीच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निवाड्याचे काय होणार? प्रेम विवाह आणि लिव्ह इन रिलेशनशिपची या देशात काय अवस्था आहे. देशाची भावना पहायची की, कुणाच्या तरी डोक्यातून आलेले खूळ पहायचे हे आता ठरवण्याची वेळ आलीय.

राष्ट्रीय

# निव्वळ चर्चेच्या फेऱ्या

**ऑगस्टमध्ये भारत आणि चीन यांच्यात उच्च स्तरावर दोनदा चर्चा झाल्या. १४ ऑगस्टला लडाखमध्ये दोन्हीकडचे वरिष्ठ सैनिक अधिकारी सीमा प्रश्नी १९व्या फेरीसाठी भेटले व दोन पूर्ण दिवस वाटाघाटी केल्यानंतर काही सकारात्मक निर्णय घेण्याचे ठरले. ते निर्णय राजकीय स्तरावर संमती मिळण्यावर अवलंबून असतील. त्यानंतर दक्षिण आफ्रिकेत 'ब्रिक्स परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी व चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांची ओझरती भेट झाली. ही भेट सकारात्मक वातावरणात झाली व सीमावादाचे पर्यवसान सशस्त्र चकमकीत होऊ नये,' असे दोन्ही नेत्यांनी म्हटले, असे भारताकडून सांगण्यात आले. चीनकडून याची पुष्टी झाली नाही. म्हणजे संभ्रम राहू द्यावा, असा चीनचा उद्देश असावा. सद्यस्थितीत सीमेवर दोन्हीकडून सैन्य तैनात आहे.**



मुख्य अडचण लडाखच्या दोन क्षेत्रात आहे - ईशान्येत देपसांग पठारावर (साधारण उंची साडेचार हजार मीटर किंवा १५ हजार फूट) आणि आग्नेयेला डेमचाक कुरणाजवळ. देपसांग पठाराचे महत्त्व असे की, भारताची आघाडीची लढाऊ विमानपट्टी दौलत बेग ओल्डी या ठिकाणी आहे व येथून काराकोरम खिंडीची वाट आहे. चीनने काही क्षेत्रात भारतीय सैनिक आणि उन्हाळ्यात याक चरायला नेणाऱ्या गुराख्यांना प्रवेश बंद केला आहे. डेमचाकमार्गे लेहला जाणारा रस्ता सामरिक महत्त्वाचा आहे. भारताला दोन्ही प्रदेशात प्रवेशाची पारंपरिक मोकळीक हवी आहे. त्याला चिनी सैनिक मनाई करत आहेत. वाटाघाटी यासाठीच आहेत. अनेक फेऱ्या झाल्या व अजून किती होतील, हे सांगता येत नाही. बळजबरीने आपण हा प्रदेश ताब्यात घेऊ शकत नाही आणि भारतीय सैनिकांना हुसकावण्याची क्षमता चीनमध्ये नाही. मग पुढे काय, हे कळण्यासाठी भारत-चीन संबंधांचा आढावा घेत चीनची अंतर्गत परिस्थितीही पाहायला हवी.

चीनबद्दल सर्व माध्यमांत काही मुद्दे नियमित येतात. २०१३ पासून शी जिनपिंग यांनी आपल्याकडे सर्व सत्ता एकवटली आहे. स्वत:ला तहहयात अध्यक्ष बनविले आहे. परिणामी सर्व निर्णय ते घेतात. याचा अर्थ, सीमेवरील वाटाघाटींसाठी त्यांनी आदेश दिले असावेत. जोपर्यंत त्यांची संमती मिळत नाही, तोपर्यंत तोडगा निघणे शक्य नाही.

सध्या जिनपिंग यांचे लक्ष त्यांच्या देशातील अंतर्गत स्थितीवर असणार. चीनची अर्थव्यवस्था पूर्वीसारखी नाही. आर्थिक मंदी जगभर आहे. परंतु याचे चीनच्या जनतेवर होणारे परिणाम शी यांची काळजी वाढवणारे आहेत. चीनचा विकास आतापर्यंत निर्यातीवर आधारित होता. त्यात अनेक अडथळे आले आहेत. कोरोना काळात चीनने कडक निर्बंध लावले. यामुळे उत्पादन उद्योग बंद पडले. त्यातच, सामरिक क्षेत्रात चीनचा आक्रमक पवित्रा पाहून अमेरिका व इतर देशांनी चिनी आयातीवर लादलेले निर्बंध तसेच आहेत. आज चीनने कोरोनाचे सर्व निर्बंध काढले असले, तरी उत्पादनात आणि अनुषंगाने निर्यातीत घट झाली आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरणाऱ्या उद्योगांना पाश्चिमात्य देशांच्या निर्बंधामुळे स्थलांतर करून उत्पादन कायम ठेवणे गरजेचे झाले आहे. त्यामुळेच, आयफोन उत्पादन किंवा फॉक्सकॉन भारतात येत आहेत. दुसरा मुद्दा म्हणजे चीनमधील वाढती महागाई आणि बांधकाम क्षेत्रात आलेली मंदी, ही तेथील तरुण वर्गाला त्रासदायक वाटत आहे. नोकरी मिळणे कठीण होत आहे. राहण्यास परवडणारी घरे नाहीत. मग लग्ने करून तरुण मुले-मुली कुठे राहणार? इतके दिवस भरभराट असलेली चिनी अर्थव्यवस्थेला आज संकटात आहे. पण यातून चुकीचे निष्कर्ष काढायला नकोत. नागरिक नाराज असले, तरी तेथे क्रांती होणार नाही. परंतु हुकूमशहांना सर्वांत जास्त धोका जवळच्या लोकांचाच असतो. याची जाणीव शी यांना असणारच. याशिवाय परराष्ट्र संबंधांत चीनला अनेक दिशांहून विरोध होत आहे. तैवानचा प्रश्न धगधगत आहे. दक्षिण चीन उपसागरात चीनच्या अरेरावीला विरोध करणाऱ्या क्वाड (अमेरिका, भारत, जपान आणि ऑस्ट्रेलिया) आणि ऑकस (ऑस्ट्रेलिया, ब्रिटन आणि अमेरिका) या संघटना सध्या सक्रिय आहेत. पुढील मुद्दाही परराष्ट्र संबंधांशी जोडलेला आहे. दहा वर्षांपूर्वी चीनने महत्त्वाकांक्षी 'बीआरआय' प्रकल्प स्थापला आणि सर्व जग व्यापारासाठी जोडण्याची योजना केली. यात पाकिस्तानातील चीन-पाकिस्तान इकोनॉमिक कॉरिडॉर (सीपेक) हा सर्वांत महत्त्वाचा प्रकल्प होता. त्यात बलुचिस्तानमधील ग्वादार बंदराचा विकास हे भव्य आकर्षण होते.

आज चिनी कामगारांना संरक्षणाशिवाय बलुचिस्तानात प्रवास करता येत नाही. तेथील स्वातंत्र्यवादी त्यांच्या काफिल्यांवर वारंवार हल्ले करतात. मदत करणाऱ्यांवर हल्ले होतात, हे कोण मान्य करेल? चीनची सर्व आर्थिक मदत बाजारातील व्याजदरावर दिली जाते. ती महाग आहे. हीच स्थिती श्रीलंकेत आहे. तेथील हंबनटोटा बंदराचे उदाहरण सर्वश्रुत आहे. पाश्चिमात्य देशांतील चीनची गुंतवणूकही वादग्रस्त ठरली असून इटली 'बीआरआय' प्रकल्पातून बाहेर पडला आहे. रशियाला पाठिंबा दिल्याने पाश्चिमात्य देशांचा चीनला विरोध वाढला आहे. थोडक्यात, अंतर्गत सुव्यवस्था असो, आर्थिक मंदी असो की परराष्ट्रांचा विरोध; या प्रमुख कारणांमुळे चीनचा प्रभाव पूर्वीसारखा राहिला नाही. या सर्व घडामोडींचा परिणाम भारत-चीन संबंधांवर होत आहे, यात नवल नाही. भारताची परिस्थिती अगदी उलट आहे. आपली अर्थव्यवस्था वाढत असून विकासदरही अधिक आहे. भारताची प्रतिमा जगात उंचावत असून चांद्रयान मोहिमेनंतर तंत्रकौशल्याची प्रशंसा होत आहे. परंतु या सर्व मुद्द्यांचा भारत-चीन सीमावाद प्रलंबित राहण्याशी काही संबंध आहे का, हा प्रश्न विचारला जाणे स्वाभाविक आहे. वाटाघाटी किंवा सीमेवर चर्चा करूनही प्रगती न होण्याचे कारण आपण समजावून घेतले पाहिजे. लडाख आणि तिबेट यांच्यातील सीमा कधीही अधिकृतपणे रेखाटली गेलेली नाही व ती नक्की कुठे आहे, हे साम्राज्यकालापासून ठरलेले नाही. ती सीमा वादग्रस्त आहे. भारताच्या स्वातंत्र्यापर्यंत चीन बलवान नसल्याने चीनला काही करता येत नव्हते. भारताचे म्हणणे आहे की, पारंपरिक प्रथेने जो आमचा प्रदेश आहे त्याबद्दल वाद नसावा. चीनला हे मान्य नसल्यानेच वारंवार चकमकी झाल्या आहेत. गलवानच्या घटनेनंतर आपल्या सैन्याला सदैव सज्ज राहण्याशिवाय गत्यंतर नाही.

पूर्वेकडे, अरुणाचल प्रदेशात मॅकमोहन लाईन ओळखली जाऊ शकते. लडाखमध्ये तसे नाही. यात दोन्ही बाजू तडजोड करायला तयार नाहीत. याचे कारण म्हणजे भारतावर दबाव ठेवायला हा चीनकडे चांगला मुद्दा आहे. नऊ आणि दहा सप्टेंबरला जी-२० देशांची शिखर परिषद दिल्लीत होत आहे. शी जिनपिंग भारतात येतील आणि सीमावादावर काहीतरी चर्चा होऊ शकेल. सध्याच्या पार्श्वभूमीवर काही तोडगा निघण्याची शक्यता कमी दिसते. आपणही फार अपेक्षा न ठेवता सतर्क आणि सज्ज राहणे आवश्यक आहे. मागे शी जिनपिंग भारतात असताना चुमर कुरणाची चकमक झाली होती. त्याची पुनरावृत्ती पुन्हा होऊ नये. तसाही चीन आणि भारत यांच्यातील सीमावाद जिनपिंग यांच्या अध्यक्षीय काळात सुटण्याची शक्यता जवळपास नाहीच.

**- आर. आर. पळसोकर.**

टुडेज् ब्लॉग

# हा खेळ समजेल का कुणाला?

गल्ली ते दिल्ली चर्चा सुरू आहे ती महाराष्ट्राच्या राजकीय पटावर सध्या सुरू असलेल्या सर्वात मोठ्या बुद्धिबळाच्या डावाची... एकीकडे आहे या खेळाचा ग्रँड मास्टर, या खेळाचा अनभिषिक्त सम्राट...समोरच्या पटावर जे दिसतंय त्यापेक्षा कितीतरी वेगळ्या, कितीतरी पुढच्या चाली ज्यांच्या डोक्यात सुरू असतात असे शरदचंद्र गोविंद पवार. तर दुसरीकडे आहेत त्यांच्याच पक्षातले, त्यांच्याच घरातले, त्यांच्याच तालिमीत अनेक वर्षे तयार झालेले नेते. २०१९ च्या पहाटेच्या शपथविधीनंतर शरद पवारांनी पक्षात आणि राज्यात नवे डाव नव्या चालींना सुरुवात केली. अजितदादांभोवती भक्कम तटबंदी करणं सुरू केलं. मात्र, फक्त ती तटबंदीच नाही तर पक्षही फोडण्यात अजितदादांना यश आलं. पण सहजासहजी हार मानतील ते शरद पवार कसले. त्यातूनच रोज नवा डाव, नवी चाल, शह, काटशह, रोज नवी विधानं, रोज नवे संकेत देणं, संभ्रम वाढवणं सुरू आहे.

सुप्रिया सुळे, शरद पवार यांची सगळी वक्तव्य ऐकून तुमचं डोकं गरगरत असेल तर यात तुमचा काहीही दोष नाही. हा गुंता कायम राहावा अशीच कदाचित राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा आणि पवार परिवाराचे कुटुंबप्रमुख शरद पवार यांची इच्छा असू शकते. साध्या साध्या गोष्टींमध्ये पवार साहेबांना नक्की काय म्हणायचंय याचा अर्थ भल्या-भल्यांना लागत नाही, इथे तर प्रश्न पक्ष आणि परिवारातील फुटीचा आहे.

फक्त राष्ट्रवादीतील नेते कार्यकर्तेच नाही तर भाजप सुद्धा आणि फक्त भाजपच नाही तर मोदी विरोधी आघाडीतील पक्ष सुद्धा शरद पवारांच्या शब्दजालात अडकून जातात. त्यातून ते सावरेपर्यंत शरद पवारांचं दुसरं वक्तव्य पुन्हा जाळ्यात ओढून घ्यायला तयार असतं. अशी परस्पर विरोधी वक्तव्य करून शरद पवार एकाच वेळी अनेकांना कामाला लावतात. सध्या त्यांच्या रोख अजित पवारांसोबत गेलेले आणि जाऊ इच्छिणारे लोक आहेत असं दिसतंय. मात्र, समोर पवारांच्याच मुशीत तयार झालेले लोक असल्याने ते आपल्या भूमिकेवर ठाम दिसतायेत.



शरद पवार कितीही नाही म्हणत असले तरी पक्षात फूट तर आहे. आणि आता तर मित्र पक्ष सुद्धा हे उघडपणे बोलू लागले आहेत. अजित पवार गटाने तसं पत्र निवडणूक आयोग आणि विधानसभा अध्यक्षांकडे दिलं आहे. त्याला शरद पवार गटाने उत्तरही दिलं आहे. त्यामुळे सध्याच्या शरद पवारांच्या वक्तव्यांना आगामी कायदेशीर लढाईचा भाग म्हणूनही बघायला हवं.

'नरो वा कुंजरो वा' पद्धतीचं बोलण्यात सुद्धा शरद पवार भीष्म पितामह आहेत. ते आज काय बोलले यावरून तुम्ही ते उद्या काय करणार याचा अंदाज लावायला गेलात तर कपाळमोक्ष, अपेक्षाभंग आणि कात्रजचा घाट ठरलेला. आपले नेते कार्यकर्ते आणि मतदारांना या शब्दजालात सापडू नयेत यासाठी अजित पवारांना सगळं कसब वापरावं लागणार हे नक्की.

पक्ष फुटला कशाला म्हणायचं? याची नवी व्याख्या शरद पवार सध्या करत आहेत. ती व्याख्या समोर बसलेल्या माध्यमांच्या प्रतिनिधींना पटो न पटो, राष्ट्रवादीच्या मतदाराला पटणं जास्त गरजेचं आहे. सुप्रिया सुळे यांनी सुद्धा आज फक्त नऊ लोक पक्षातून बाहेर पडले आणि सरकारमध्ये मंत्री झाले अशी नवी लाईन घेणं सुरू केलं आहे. या मांडणीला अजित पवार गट कसं तोंड देतो त्यावर फक्त राष्ट्रवादीचंच नाही तर महाराष्ट्राचं पुढचं राजकारण अवलंबून असेल.

कधी डावीकडचं इंडिकेटर देऊन गाडी उजवीकडे वळवायची, कधी डावीकडचं इंडिकेटर देऊन गाडी तशीच सुसाट सरळ जाऊ द्यायची, तर कधी डावीकडचं इंडिकेटर देत गाडी डावीकडेच वळवत; फॉलो करणाऱ्यांना, बघणाऱ्यांना, गाडीत बसलेल्यांना सगळ्यांनाच धक्का द्यायचा, असं चित्र आपण गेली ४-५ दशकं बघत आलो आहोत. या मुरलेल्या योद्धाच्या भात्यामध्ये आणखी काही नवीन अस्त्र उरले आहेत का हे २०२४ च्या निवडणुकीआधी कळेलंच. तोवर फक्त अर्थ शोधत राहाणं एवढंच आपल्या सारख्यांच्या हाती..

**- संदीप रामदासी.**

जन्म हा अखेरचा

# शिष्यस्थल - ३



राजाला मोठा आनंद झाला, तो कुलगुरुकडे येऊन म्हणाला, 'आपल्या एका शिष्याने माझी विनंती मान्य करुन राजकन्येसोबत विवाह करण्याचा होकार दिला आहे.'

गुरुंना मोठे आश्चर्य वाटले. त्यांनी शिष्याला आपल्यासमोर येऊन येण्यास सांगितले. चोर मनातून पार घाबरला होता. आपले पितळ उघडे पडेल अशी त्याला भीती वाटली. धैर्य एकवटून तो गुरुसमोर येऊन बसला. गुरु त्याच्याकडे त्याच्या डोळ्यांना डोळे भिडवून एकटक पहात राहिले. हळूहळू गुरुचे योगसामर्थ्य त्याच्या देहा-मनात प्रविष्ट होऊन त्याच्या ठायी वैराग्य उत्पन्न झाले. गुरुंनी त्याला विचारले, 'राजकन्येशी विवाह करण्यास तु तयार आहेस काय?' तेव्हा त्याने दृढनिश्चयाने उत्तर दिले, ''नाही''. गुरुच्या कृपादृष्टीने त्याचे सर्व पूर्वसंस्कार नष्ट होऊन तो वैराग्यसंपन्न झाला. गुरुकृपाकटाक्षाचे असे महत्व आहे. लोहाचे सुवर्ण व्हावे त्याप्रमाणे गुरुकृपादृष्टीने सामान्य जीवाचे सोने होऊन जाते.

**न लंघयेद् गुरोराज्ञां ज्ञानमे प्रकाशनयन् ।**

**शिवासक्तेन मनसा सर्वसिद्धिमवाप्नुयात् ।।**

**१७.६५ ।।** शिष्याने गुरुच्या आज्ञेचे उल्लंघन कधी करु नये. कारण गुरुंच्या आदेशानेच त्याचे कल्याण होणार असते. शिवरुप अशा गुरुच्या ठिकाणी दृढभक्ती ठेवल्यामुळे शिष्याला सर्वसिद्धी प्राप्त होतात.

**शिवादन्यज्जगन्मिथ्या शिव: संवित्स्वरुपक: ।**
**शिवस्त्वमित्ति निर्दिष्टो गुरुणा मुक्त एव स:।। १७.६६।।**

गुरु शिष्याला उपदेश करतात की, हे जग शिवस्वरुप आहे, तू देखील चिद्रुप असल्यामुळे शिवस्वरुपच आहेस. असा ज्ञानोपदेश गुरुकडून शिष्याला प्राप्त होतो. ह्या गुरुपदेशाचे श्रवण करणारा शिष्य जीवन्मुक्त होतो. अर्थात् त्याला पुनर्जन्माचे भय राहत नाही. शेवटी या शिष्यस्थलाचा समारोप करताना ज. रेणुकाचार्य म्हणतात,

**गुरोर्लब्वा महाज्ञानं संसारामयभेषजम् ।**
**मोदते य: सुखी शान्त: स**
**जीवन्मुक्त एव हि ।।१७.६७।।**

**(क्रमश:) – काशी जगद्गुरु**
**डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

# अत्याचार रोखण्यासाठी छ. शिवरायांचा कायदा हवा

सध्या देशांमध्ये महिलांवर, मुलींवर लैंगिक छळाच्या घटनांमध्ये वाढंच होताना दिसत आहे आजच्या घडीला सरकार अशा घटनांचा बीमोड करण्यासाठी हरतऱ्हेने प्रयत्न करत आहे. पण त्याला अजूनही यश आल्याचे दिसून येत नाही जेवढे कायदे कडक आहेत, तेवढ्या पळवाटाही आहेत तसेच कायद्यांची अंमलबजावणी काटेकोरपणे होताना दिसत नाही.



महिला अथवा मुलींच्यावर जे अत्याचार करणारे किंवा यासारख्या घटनेतील गुन्हेगार आहेत, ते या गुन्ह्यांमधून सहीसलामत सुटून उजळ माथ्याने समाजात फिरतात. त्यामुळे पुन्हा त्यांना असे गुन्हे करण्यास वाव मिळतो. गुन्हेगारांना कायद्याची भीतीचं उरलेली नाही. लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्ये महिला अथवा मुली आपले नाव बदनाम होईल, इज्जत जाईल या भीतीपोटी घडलेला प्रकार घरच्यांना किंवा पोलिसांना सांगण्याच्या भानगडीत पडत नाहीत. त्यामुळेच अशा गुन्हेगारांचे फावते. आज अनेक प्रकारे महिलांना, मुलींना आमिष दाखवणे, बळजबरी करणे, धमकावणे, फसविणे, गुंगीचे पदार्थ देऊन मोबाईलवर चित्रफीत बनवून सार्वजनिक अर्थात व्हायरल करणे अशाप्रकारे भीती घालून अत्याचार, लैंगिक छळ केला जातो. ज्यावेळी घटना घडते, त्यावेळीच त्याची जास्त चर्चा होताना दिसते, काही कारवाया होतात. नंतर ती घटना माघारी पडते, लोक विसरून जातात. तोपर्यंत दुसरी घटना कानी पडते हे असेच किती दिवस चालणार? असा सवाल उपस्थित होत आहे. महिला असो अगर मुलींवर अत्याचार करणाऱ्या गुन्हेगारांना जरब बसवण्यासाठी छत्रपती शिवरायांचा कायदा अंमलात आणावा, जसे गुन्हेगाराचा चौरंग केला तसा कायदा असावा, ही एकच शिक्षा योग्य वाटते. पुन्हा असे करण्यास गुन्हेगार वळणार नाहीत आणि अशा घटनांना आळा बसण्यास मदत होईल.

**- राजू जाधव, मांगूर, जि. बेळगाव.**

## फक्त घोषणेबाजी नको...

आता तर डाळी, कडधान्ये, भाजीपाला, धान्य सारेच महागले असून सर्वसामान्य जनतेला चांगलें जीवनमान मिळावे यासाठी उपाययोजना केव्हा होणार? पाऊस अजूनही सगळीकडे आलेला नाही, काही ठिकाणी कोरडा दुष्काळ तर काही ठिकाणी महापूर अशी अवस्था आहे. याकडे कोण लक्ष देणार? राजकारण तर फक्त सत्ता टिकवण्यासाठी होताना जनहिताच्या संदर्भात मोठी घोषणाबाजी होत आहे.

**- प्र. मु. काळे, नाशिक.**

# एक देश-एक अभ्यासक्रम

**खासगी शाळा मनमानी पद्धतीने महागडी पुस्तके घेण्यासाठी मुले आणि पालकांवर दबाव टाकत असल्याचे अनेकदा दिसून येते. अशा प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी एक देश-एक अभ्यासक्रम उपयुक्त ठरेल. तात्कालिक फायद्यासाठी आणि निहित राजकीय स्वार्थाच्या पूर्ततेसाठी अनेक वेळा जात, भाषा, प्रांत, धर्म आणि विविध अस्मिता यांच्या नावावर देश आणि समाजात फूट पाडण्याचे दुष्टचक्र चालू असते. 'एक देश-एक अभ्यासक्रम' अशा विभाजनवादी विचारसरणी आणि फुटीरतावादी प्रवृत्तींना आळा घालेल आणि राष्ट्रीय एकात्मता आणि अखंडतेची भावना मजबूत करेल.**

जर एक राष्ट्र-एक कर, एक राष्ट्र-एक रेशन कार्ड, एक राष्ट्र-एक ग्रीड, एक राष्ट्र-एक परीक्षा शक्य असेल, तर एक राष्ट्र-एक अभ्यासक्रम का नाही? शिक्षणाचे माध्यम आणि भाषा जरी भिन्न असली, तरी स्थानिक समस्यांना महत्त्व देण्यासाठी राज्ये साहित्य आणि सामाजिक शास्त्रासारख्या विषयांमध्ये किरकोळ बदल करू शकतात, परंतु सर्व विद्यार्थ्यांना समान शिक्षण आणि समान संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने. एक राष्ट्र-एक अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करावी. यामुळे विविध बोर्डांमध्ये शिकविल्या जाणाऱ्या विविध अभ्यासक्रमांमुळे विविध स्पर्धा परीक्षांदरम्यान विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी आणि आव्हाने कमी होतील.

अलीकडेच राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने (एनसीईआरटी) इयत्ता तिसरी ते बारावीची पाठ्यपुस्तके तयार करण्यासाठी तज्ज्ञांची एक समिती स्थापन केली. या राष्ट्रीय अभ्यासक्रम आणि अध्यापन सामुग्री समितीमध्ये विविध क्षेत्रातील १९ नामवंत व्यक्ती आणि तज्ज्ञांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये इन्फोसिस फाउंडेशनच्या अध्यक्षा सुधा मूर्ती, पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार समितीचे अध्यक्ष विवेक देवराई आणि सदस्य संजीव संन्याल, प्रसिद्ध गायक आणि संगीतकार शंकर महादेवन, भारतीय भाषा समितीचे अध्यक्ष चामू कृष्ण शास्त्री आदींचा समावेश आहे. त्याचे अध्यक्षपद नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशनल प्लॅनिंग अँड ॲडमिनिस्ट्रेशनचे कुलगुरू महेशचंद्र पंत आणि सह-अध्यक्षपद प्रिन्स्टन विद्यापीठाचे प्राध्यापक मंजुल भार्गव यांच्याकडे सोपवण्यात आले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० च्या



अंमलबजावणीचा एक भाग म्हणून ही समिती काम करेल. कस्तुरीरंगन यांनी शालेय शिक्षणासाठी नॅशनल करिक्युलम फ्रेमवर्कसह अभ्यासक्रमाचे संरेखन केले. ही स्वायत्त संस्था आवश्यक असल्यास, इतर विषय-तज्ज्ञांना सहाय्य आणि सल्लामसलत इत्यादीसाठी आमंत्रित करण्यास मुक्त असेल. १००० पेक्षा जास्त विषय तज्ज्ञांचा अभ्यासक्रम विकास आणि पाठ्यपुस्तकांची रचना इत्यादी प्रक्रियेत सहभाग असेल. या शैक्षणिक वर्षाच्या अखेरीस इयत्ता तिसरी ते बारावीसाठी पाठ्यपुस्तके तयार करणे आणि इयत्ता १ आणि २ साठी सध्याच्या पाठ्यपुस्तकांमध्ये योग्यरीत्या सुधारणा करणे हे समितीचे उद्दिष्ट आहे.

विज्ञान, गणित, तंत्रज्ञान यांसारख्या विषयात प्रावीण्य असलेली व्यक्ती कला, नृत्य, संगीत, साहित्य, संस्कृती, मानवता, शारीरिक शिक्षण या विषयांतही पारंगत असावी असे नाही. त्यामुळे विविध आवडीनिवडी, विषय आणि सध्याच्या बहुविध गरजा पूर्ण करण्यासाठी पाठ्यपुस्तके तयार करण्यासाठी समितीमध्ये विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश करणे अत्यंत योग्य आहे. या प्रक्रियेत शंकर महादेवन भारतातील शास्त्रीय नृत्य-संगीत, सुधा मूर्ती महिला सशक्तीकरण, विवेक देवराय आणि संजीव संन्याल मुक्त आणि प्राचीन भारतीय अर्थव्यवस्था इत्यादींचे उत्तम समायोजन करू शकतात.

सन २००६ नंतर अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तकांमध्ये कोणताही बदल झालेला नाही, हे लक्षात घेण्यासारखे आहे, तर १० ते १५ वर्षांच्या अंतराने पिढ्यांच्या आवडी, विचार, स्वभाव, प्रवृत्ती आणि गरज इत्यादींमध्ये बदल होत असतो. माहिती, ज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या या युगात या बदलाचा वेग अधिक आहे. अशा परिस्थितीत अभ्यास-अध्यापन व्यावहारिक, रोजगाराभिमुख, प्रासंगिक आणि जीवनोपयोगी ठेवण्याच्या दृष्टिकोनातूनही अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तकांमध्ये बदल करणे आवश्यक आहे. हे लक्षात घेतले पाहिजे की विद्यार्थ्यांमध्ये आत्मसाक्षात्कार, राष्ट्र-जाणिवा, नागरी जाणिवा आणि जबाबदारीची भावना निर्माण व्हावी आणि निसर्ग-परिसर-पर्यावरण आणि संस्कृती इत्यादींविषयी ओढ निर्माण व्हावी, यासाठी योग्य ते बदल करण्याची अनेक दशकांपासून मागणी करण्यात आली आहे.

अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तकांमध्ये बदल केल्यानंतर केंद्र आणि राज्य सरकारने अशी व्यवस्था केली पाहिजे की, सर्व मंडळांचे विद्यार्थी एकच पुस्तके वाचतील, जेणेकरून विविध मंडळांकडून दिल्या जाणाऱ्या शिक्षणातील तफावत आणि भेदभाव दूर होईल. संपूर्ण देशात एक शिक्षण, एक अभ्यासक्रम आणि एक परीक्षा प्रणाली विकसित करणे हा राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा मूळ आत्मा आहे.

**- रवींद्रकुमार जाधव.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# आरोग्य क्षेत्रातील विकासासाठी नेत्रालयाची उभारणी : आ. संजयमामा

सुराज्य/माढा

**माढा तालुक्याच्या सर्वांगीन विकासाच्या दृष्टीने कर्मयोगी आमदार बबनराव शिंदे नेत्रालयाची उभारणी करण्यात आली असून या माध्यमातून माढा तालुक्यातील नेत्ररूग्णांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे सुतोवाच करमाळा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार संजयमामा शिंदे यांनी व्यक्त केले.**

माढा तालुक्याचे आमदार बबनराव शिंदे यांच्या ७२ व्या वाढदिवसानिमित्त प्रमुख अतिथी सोलापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे पोलीस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित नेत्रालयाच्या आणि मोफत मोतीबिंदु शस्त्रक्रिया शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

आपल्या भाषणात ते पुढे म्हणाले की तालुक्यात सर्व क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती झाली आहे.शिंदे कुटूंबियांच्या प्रत्येक शब्दाला मान देत जनतेने सर्वतोपरी सहकार्य केले.याचमुळे शेती उद्योग आणि इतर अनेक क्षेत्रात तालुक्याने मोठी प्रगती केली.मात्र शिक्षण आणि आरोग्य या दोन क्षेत्रातील प्रगतीबाबत सातत्याने बोट दाखवले जायचे.मात्र गेल्या काही वर्षापासून शैक्षणिक क्षेत्रातही मोठ्या संस्था उभारून शिंदे कुटंबीय जनतेची सेवा करीत आहे. आणि आज या कर्मयोगी आमदार बबनदादा शिंदे नेत्रालयाच्या माध्यमातून आरोग्यसुविधा सक्षम केली जाणार आहे. हे एक टीमवर्क असून आपण सर्वांनी स्वयंस्फूर्तीने मदत केल्याने आरोग्याची कमतरता या माध्यभातून भरून निघणार असल्याचे सांगितले. सत्काराला उत्तर देताना आमदार बबनराव शिंदे यांनी वाढदिवसाच्या निमित्ताने मतदारसंघातील जनतेने आपल्यावर भरभरून प्रेम केल्याबद्दल ऋण व्यक्त केले. नेत्रालयासाठी स्वयंसस्फूर्तीने ७२ लाख रूपये पहिलूयाच दिवशी जमा झाल्याचे सांगितले. याचबरोबर १०५५५ रक्तदात्यांनी उतूसफुर्तपणे रक्तदान करून विक्रम केलेबद्दल अभिनंदन केले. वाढदिवसानिमित्त तालुकायातील १ लाख विद्यार्थ्यांना वह्या वाटप केल्याचे सांगितले.

पद्मश्री डॉ तात्याराव लहाने यांनी हे नेत्रालय पैसे मिळवण्यासाठी नसून सर्वसामान्य रूग्णाच्या सेवेसाठी आहे.दैनंदिन नेत्रतपासणी करीत प्रत्येक महिन्याच्या एका शनिवारी व रविवारी नेत्रशस्त्रक्रिया केल्या जाणार असल्याचे सांगितले. याप्रसंगी माजी आमदार विनायकराव पाटील जिल्हा दुध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिदे शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शीचे डॉ बी वाय यादव आदिनी मनोगते व्यक्त करून आमदार दादांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविकात अशोकशेठ लुणावत यांनी केले.

कार्यक्रमास प्रांताधिकारी प्रियांका आंबेकर डॉ रागिनी पारेख जिल्हा दुध संघांचे अध्यक्ष रणजितसिंह शिंदे, सभापती विक्रमसिंह शिंदे, सदस्य धनराज शिंदे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवाजी थोरात, डॉ. गणेश इंदुरकर, उपसभापती सुहास पाटील, माजी जि. प. अध्यक्षा डॉ. निशीगंधा माळी, माजी जि प सदस्य झुंजार भांगे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी. व्ही. चवरे आणि राजेंद्र गुंड यांनी केले.

## पहिल्याच दिवशी ७२ लाखांची स्वयंस्फूर्तीने मदत



कर्मयोगी आमदार बबनराव शिंदे नेत्रालयाला संस्था कार्यकर्ते आणि तालुक्यातील कर्मचारी यांचेकडून उत्सफूर्तपणे पहिल्याच दिवशी ७२ लाख रूपयांची मदत केली गेली.तर तालुक्यातोल १ लाख विद्यार्थ्यांना जिल्हा दुध संघांचे अध्यक्ष तथा जि प सदस्य रणजितसिंह शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली वाटप करण्यात आले.

आ. बबनराव शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित रक्तदान शिबीरामध्ये १०५५५ रक्तदात्यांचे विक्रमी रक्तदान.

## जीवनाचा आनंद घेण्यासाठी छंद आवश्यक : किशोर चंडक

सुराज्य/सोलापूर



जीवनाचा खरा आनंद घ्यायचा असेल तर प्रत्येकांनी एकतरी छंद जोपासला पाहिजे, असे मत उद्योगपती आणि जागतिक डाक तिकीट संग्राहक किशोर चंडक यांनी सांगितले. भारतीय डाक विभाग व सारथी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने प्रिसिजन इंग्लिश स्कूल मधील विद्यार्थ्यांना दीनदयाल स्पर्श योजनेसंबंधी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी व्यासपीठावर सारथी फाऊंडेशनचे संस्थापक श्रीनिवास बुरा, भारतीय डाक विभागाचे अधिकारी श्रीरंग रेगोटी उपस्थित होते.

श्री. चंडक मुलांशी हितगुज करताना काही जुन्या पोस्ट तिकिटांविषयी मनोरंजक अशी माहिती दिली. त्यांनी स्वतः कोणकोणत्या वस्तूंचा संग्रह कशाप्रकारे केला, हे प्रत्यक्ष नमुने दाखवून त्याचे किस्से सांगितले. नोटा, नाणी, पोस्ट तिकिटे, काडीपेट्या, सह्या, असे अनेक वस्तूंचा संग्रह करण्यासाठी मुलांना मार्गदर्शन केले. उपस्थित विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून योग्य उत्तर देणाऱ्यांना महागडे पोस्ट तिकिट बक्षीस दिले. श्रीरंग रेगोटी यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना दीनदयाल स्पर्श स्कॉलरशीप योजने विषयी सविस्तर माहिती दिली.

प्रिसिजन स्कूलमधील सुनील नवले, मनिषा राठोड व इतर शिक्षकांसह अनेक विद्यार्थ्यांनी या अनोख्या कार्यक्रमाचा आनंद लुटला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीनिवास बुरा यांनी केले तर सूत्रसंचालन कल्याणी कोळी यांनी केले.

# मराठा समाज पुन्हा पेटला

## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या विरोधात घोषणाबाजी

सुराज्य/सोलापूर



जालना जिल्ह्यातील अंतरवली सराटी गावामध्ये पोलीसांनी आंदोलकांवर केलेल्या लाठीचार्जचे पडसाद राज्यभर उमटले आहेत. ठिक ठिकाणी आंदोलन जाळपोळ चालू आहे.सोलापुरात देखील या घटनेचे पडसाद उमटले. शुक्रवारी रात्री छत्रपती शिवाजी महाराज चौकात मराठा समाजाच्या वतीने राज्यशासनाच्या विरोधात आंदोलन करत पोलिस आणि शासनाचा निषेध केला. तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्या विरोधातही आंदालन करण्यात आले.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जालना उपोषण चालू आहे. २९ ऑगस्टपासून मराठा मोर्चा समन्वयक मनोज जरांगे यांच्यासह १० जण आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलनाला बसले आहेत.उपोषणकर्त्या आंदोलकांची प्रकृती खालावण्याची भीती निर्माण झाली होती. त्यामुळे उपोषण आंदोलन चिघळू नये यासाठी पोलिसांकडून उपोषण करणाऱ्या आंदोलकांना ताब्यात घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्याला आंदोलकांनी विरोध केला. पोलिसांनी लाठीचार्ज केला. तर आंदोलकांकडून दगडफेक करण्यात आली. या घटनेचे तीव्र पडसाद उमटण्याची शक्यता आहे. या घटनेनंतर जिल्ह्यात तणावाची स्थिती आहे. ठिक ठिकाणी आंदोलन, निषेध केले जात आहेत. सोलापुरात देखिल या घटनेचे पडसाद उमटले आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौकात शुक्रवारी रात्री मराठा समाजाच्या वतीने तीव्र आंदोलन करत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्या विरोधात आंदोलन करण्यात आले. राज्यशासनाचा निषेध करण्यात आला. एक मराठा, लाख मराठा अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या. यावेळी राजन जाधव, विनोद भोसले, दास शेळके, सुनिल रसाळे, श्रीकांत डांगे, तात्या वाघमारे, मतीन बागवान, प्रशांत बाबर, राम गायकवाड, सुनिल शेळके, दत्ता भोसले, तुकाराम मस्के, शिरीष चव्हाण,विजय पुकाळे, प्रताप कांचन यांच्यासह मराठा समाज मोठ्या संख्यने सहभागी झाला होता.

### पोलीस अधीक्षकांवर कारवाई करा: अनंत जाधव

मराठा समाजला आरक्षण मिळवण्यासाठी आंदोलकर्त्यावर जो अमानुष लाठीहल्ला झाला. या घटनेचा जाहीर निषेध आहे. लाठीमार करण्याचा आदेश देणाऱ्या पोलीस अधीक्षकांवर कारवाई करत निलंबन करावे, अशी मागणी यावेळी भाजपचे माजी नगरसेवक अनंत जाधव यांनी केली आहे.

### पोलीस अधीक्षकांना निलंबित करा: किरण पवार

जालना येथील लाठीहल्ल्याचा जाहीर निषेध. मराठा समाजाला आरक्षण मिळावं म्हणून आमरण उपोषण करणाऱ्या मराठा समाज बांधवांवर जो अमानुष लाठीमार केला. त्या घटनेचा मी जाहीर निषेध करतो. या लाठीमार करण्याचा आदेश देणाऱ्या संबंधित पोलीस अधीक्षकांना तात्काळ निलंबित करून या घटनेची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी मराठा क्रांती मोर्चाचे किरण पवार यांनी केली आहे.

### आज जिल्हाधिकाऱ्यांना भेटणार: रसाळे

समाज बांधवांवर जो हल्ला केला त्याचा निषेध आहे. याची पूर्ण जबाबदारी महाराष्ट्र शासनावर राहील. शनिवारी सकाळी साडेअकरा वाजता मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना शेवटचा इशारा देण्यासाठी निवेदन देण्यात येणार आहे, असे मराठा क्रांती मोर्चाचे समन्वायक सुनील रसाळे यांनी म्हटले आहे.

### जनरल डायरचे सरकार: विनोद भोसले

आरक्षणाच्या मागणीसाठी लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या मराठा समाजावर शिंदे- फडणवीस सरकाने निर्दयी निष्ठूरपणे लाठीचार्ज केला. यामध्ये महिलांच्या अंगावर हात घातला अशा सरकारचा निषेध माजी नगरसेवक विनोद भोसले यांनी केला आहे. हे जनरल डायरचे सरकार आहे, असेही ते म्हणाले.

## नगरपालिका क्षेत्रात विकासासाठी १० कोटींचा निधी

सुराज्य/सोलापूर

**सोलापूर महापालिका, अक्कलकोट, मैंदर्गी, दुधनी, मंगळवेढा, मोहोळ नगरपरिषद क्षेत्रातील विकासकामे होणार**



राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडून सोलापूर लोकसभा मतदार संघातील विविध विकासकामांकरीता १० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. यामुळे सोलापूर लोकसभा क्षेत्रातील सोलापूर महापालिका, अक्कलकोट, मैंदर्गी, दुधनी, मंगळवेढा, मोहोळ नगरपरिषद क्षेत्रातील अनेक विकासकामे मार्गी लागणार असल्याची माहिती खा. डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामींनी दिली.

नगर विकास विभागाने शुक्रवारी २८ ऑगस्ट रोजी याबाबत शासन निर्णय मंजूर केला. सोलापूर महानगरपालिका क्षेत्रासाठी एकूण ६ कोटी ४० लाख रुपये, अक्कलकोट नगरपरिषद ९० लक्ष, मैंदर्गी नगरपरिषद ६५ लक्ष, दुधनी नगरपरिषद ६० लक्ष , मंगळवेढा नगरपरिषद ९५ लक्ष, मोहोळ नगरपरिषद ५० लक्ष अशा सहा नगर क्षेत्रातील विविध विकास कामांसाठी एकूण १० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

या योजनेअंतर्गत नागरी (शहरी) भागात क्रीडा मैदानाचा विकास करणे, पेवर ब्लॉक टाकणे, बंदिस्त गटार करणे, ड्रेनेज लाईन टाकणे, वसाहत परिसरात सिमेंट काँक्रिट करणे, पिण्यासाठी पाइपलाइन टाकणे, सी.सी. टिव्ही व सोलर हायमास्ट बसविणे, बहुउद्देशीय सभागृह बांधणे, नागरी वसाहतीत अंतर्गत सिमेंट रस्ता करणे, संरक्षक भिंत करणे, परिसर सुशोभिकरण करणे अशा स्वरूपाच्या विविध कामांचा समावेश आहे. हा विकासनिधी मिळाल्याने अनेक प्रलंबित कामे लवकरच पूर्ण होणार असल्याची माहिती खा.डॉ.जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामींनी दिली.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे खा.डॉ.जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला होता. त्यास मंजुरी दिल्याने तिघांचेही आभार मानले. यामुळे भागातील महत्वाचे प्रश्न सुटण्यास मदत मिळाली असल्याचे खा.डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांनी सांगितले.



## महापारेषण कंपनीच्या सांगलीच्या आशादीप विशेष मुलांच्या शाळेस मदत

**कराड** : महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी तर्फे सामाजिक बांधिलकी योजना अंतर्गत कंपनीला मिळणा-या नफ्यातून शासकीय शाळा / विविध सेवाभावी संस्था यांना या योजनेतून विविध स्वरूपात मदत केली जाते. याच योजने अंतर्गत सांगली येथील आशादीप विशेष मुलांची शाळा, सांगली (मतिमंद मुलांची शाळा) या शाळेस वस्तु रूपात मदत प्रदान करण्यात आली आहे.

त्यामध्ये शिलाई मशीन, जिमचे साहित्य, डे केअर सेंटरचे साहित्य, अर्ली इंटरवेशन केंद्राचे साहित्य तसेच मुलांना रोज लागणारे साहित्य प्रदान करण्यात आले. सदरच्या देणगी प्रदान कार्यक्रमास सी. एल. कोळी, प्रभारी मुख्य अभियंता, परिमंडल, कराड, आर. बी. चव्हाण, एस. एम. तावरे व आर. एच. पाटील, हे कार्यकारी अभियंता व आर. डी. कोळी, सहा. महाव्यवस्थापक (प्रभारी) परिमंडल, कराड, एस. टी. गोड, एम. जी. पाटणकर, एन. के. डाके, अति. कार्यकारी अभियंता तसेच पी. एस. पाटील, व्यवस्थापक (विवले) व सी. डी. मनगुत्ते, उप व्यवस्थापक (विवले) हे अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमास आशादीप शाळेचे डायरेक्टर फादर अनिश कुरियन व सतनामकौर चड्डा, मुख्याध्यापिका तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

## सार्वजनिक मध्यवर्ती मंडळातर्फे आज बक्षीस समारंभ

**सोलापूर** : येथील सार्वजनिक मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाच्या वतीने गतवर्षी घेतलेल्या विविध स्पर्धांचा बक्षीस समारंभ आज शनिवार दि.२ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५-०० वाजता शिवानुभव मंगल कार्यालय येथे शिवाजी सावंत यांच्या हस्ते तर सुधीर खरटमल यांच्या अध्यक्षतेखाली तसेच पोलीस उपायुक्त कबाडे,दिलीप कोल्हे,चेतन नरोटे व नरेंद्र काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.तरी स्पर्धकांनी व मंडळांनी उपस्थित रहावे,असे आवाहन ट्रस्टी अध्यक्ष बसवराज येरटे व उत्सव अध्यक्ष अमोल शिंदे यांनी केले आहे.

# सोलापुरात लंपीग्रस्त जनावरांचा वावर

सुराज्य/सोलापूर



ग्रामीण भागात जनावरांना होत असलेला लंपी आजार आता शहरात आला असून शहरांमध्ये चौका चौकात फिरणाऱ्या मोकाट जनावरांमध्ये हा आजार मोठ्या प्रमाणात झाल्याचे दिसून येत आहे.

मागील सहा महिन्यापूर्वी ज्या जनावराच्या लंपीआजाराने जिल्ह्यात थैमान घातले होते. तो आजार पुन्हा डोके वर काढत आता सोलापूर शहरातील जनावरांमध्ये आला आहे.त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून शहरातील चौका चौकात रिकामी जागी जनावरे गाई बसल्या असतील त्या ठिकाणी चांगली जनावरे सोडू नका आजारी झालेल्या जनावराजवळ जाऊ देऊ नका. त्यामुळे बाधित जनावरांकडून चांगल्या जनावरांना याची लागण होऊ शकते . वाहतूकदारांनी जनावरांचे एकत्रित वाहतूक करू नये. बाधित झालेल्या जनावरांना एकत्र ठेवू नये तसेच आजार बरा होण्यासाठी पशु संवर्धन पाल्याने पशुसंवर्धन डॉक्टर यांच्याशी संपर्क साधून यावर जनावरांसाठी तातडीने इलाज करून घ्या. त्याकरिता पशुसंवर्धन विभागाकडे सर्व प्रकारचे औषध उपलब्ध आहेत. जनावरे दिवसातून दोन वेळा धुवावीत.जनावरे ज्या ठिकाणी बांधली आहेत. सध्या सोलापूर जिल्ह्यात सांगोला, पंढरपूर, माळशिरस या ठिकाणी जनावरांना मोठ्या प्रमाणात लागन झाली असून त्यावर तातडीचे उपाय म्हणून पशुसंवर्धन खात्याकडे संपर्क साधावा.

सध्या सोलापूर जिल्ह्यात लागण झालेल्या जनावरांची संख्या जवळपास ६० ते ७० झाली असून वडगाव या गावातही दोन-चार गाईंना याची लागण झाली असल्याचे सांगण्यात आले. अशा जनावरांच्या आजाराच्या काळात दूध काढून विक्री करू नये. अशा प्रकारची खबरदारी घेतल्यास जनावरांना होणारा लंपी आजार तातडीने बरा होण्यास मदत होते. असे डॉक्टरांनी सांगितले.

## अंजनाबाई शिंदे यांचे निधन



**अक्कलकोट** : दहिटणे गावचे माजी सरपंच तथा सोलापूर जिल्हा भारतीय जनता पार्टीचे माजी जिल्हाध्यक्ष बलभिमभाऊ शिंदे यांच्या मातोश्री अंजनाबाई दत्तात्रय शिंदे ( वय - १००) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा उद्या (शनिवारी) सकाळी ११ वाजता दहिटणे (ता. अक्कलकोट) येथील राहत्या घरापासून निघणार आहे. त्यांच्या पश्चात तीन मुले, सूना, नातवंडे असा परिवार आहे. त्या अक्कलकोट बाजार समितीचे माजी सभापती गोकुळ शिंदे यांच्याही मातोश्री व गोकुळ शुगरचे चेअरमन दत्ता शिंदे यांच्या आज्जी होत.

# जि.प. बांधकामचे खराडे यांच्याकडे ग्रामीण पाणीपुरवठ्याचा प्रभारी चार्ज

सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठ्याचे प्रभारी कार्यकारी अभियंता सुनील कटकधोंड यांच्याकडील नुकताच चार्ज काढला असून बांधकाम क्रमांक १ चे नरेंद्र खराडे यांच्याकडे प्रभारी चार्ज देण्यात आला आहे. अशी माहिती जिल्हा परिषदेच्या सीईओ मनीषा आव्हाळे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

कडक शिस्तीच्या म्हणून केवळ दीड महिन्यातच आपली छाप निर्माण केलेल्या जिल्हा परिषदेच्या सीईओ मनीषा आव्हाळे यांनी नुकताच एक मोठा तडकाफडकी निर्णय घेतला. मागील पाच महिन्यांपासून अतिशय वादग्रस्त ठरलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचा कारभार सांभाळणाऱ्या प्रभारी कार्यकारी अभियंता सुनील कटकधोंड यांचा पदभार काढून घेतला. एकीकडे कटकधोंड यांच्या कामाचे कौतुक त्यांच्याकडून होत असताना दुसरीकडे तडका फडकी पदभार काढून घेतला त्यामुळे जिल्हा परिषदेच्या आवारात चर्चे चा विषय होत होता. ग्रमीण पाणी पुरवठा विभाग अंतर्गत चालणाऱ्या जलजीवन मिशन योजनेत अनियमितता असल्याने त्याची चौकशी झाली.

त्यानंतर तत्कालीन कार्यकारी अभियंता दीपक कोळी याची चौकशी लागली. कोळी यांच्याबरोबरच उप अभियंता कटकधोंड यांची ही चौकशी सुरू आहे. कोळी यांची बदली झाल्यानंतर त्यांचा पदभार द्यायचा कुणाकडे? असा विषय होता. १८९ कामाच्या फायलींचा गोंधळ अशा परिस्थितीमध्ये कटकधोंड यांनी पदभार घेऊन मागील पाच महिने जिल्ह्याचे अकरा आमदार त्यासोबत अनेक स्थानिक नेत्यांना सांभाळून कामकाज केले आहे. काम करताना काही जणांचा विरोधही त्यांनी स्वीकारला परंतु जलजीवनची घसरलेली गाडी पुन्हा रुळावर आणण्याचा प्रयत्न त्यांनी केल्याचे पाहायला मिळाले. शेवटी चांगल्या कामाचे बक्षीस नाही तर.... त्यांची चौकशी चालू असल्याने सीईओ आव्हाळे यांनी त्यांचा पदभार काढला आहे. सध्या जिल्हा परिषदेमध्ये तत्कालीन कार्यकारी अभियंता कोळी यांच्याबाबत सर्वजणच वाईट बोलतात परंतु कटकधोंड यांचा पदभार काढल्याने जिल्हा परिषदेतील अनेक विभाग प्रमुख त्यांच्या कामाचे कौतुक करताना पहायला मिळत आहे.

सीईओ आव्हाळे यांनी ग्रामीण पाणी पुरवठा विभागाला पूर्णवेळ अधिकारी देण्याची मागणी केली आहे. जिल्हा परिषदेतील सर्वांनाच अपेक्षा होती की, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचा पदभार बांधकाम कार्यकारी अभियंता बांधकाम २ चे कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी यांच्याकडे येईल, परंतु अनपेक्षितपणे खराडे यांच्याकडे चार्ज देण्यात आला आहे. पहिलेच माझ्यावर कामाचा एवढा लोड अन् परत जलजीवन मिशनची किरकिरी आल्याने खराडे हे टेन्शन मध्ये असल्याची चर्चा झेडपी मध्ये रंगली आहे.



## अक्कलकोटमध्ये भारतीय संस्कृती व तत्वज्ञान यांचे प्रतिबिंब : डॉ. कराड

✔ सुराज्य/अक्कलकोट : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून सुरु असलेले कार्य भावना व्यक्त करण्यासाठी मला माझे शब्द अपुरे पडतात, या ठिकाणी खरोखरच आपली भारतीय संस्कृती व तत्वज्ञान यांचे प्रतिबिंब अनुभवला आले असल्याचे मनोगत युनिस्को, एमआयटी पुणे, जागतिक शांतता केंद्र आळंदी चे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रो. विश्वनाथ कराड यांनी व्यक्त केले.

ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सह परिवार आले असता न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्याकडून श्रींची मूर्ती, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी त्यांच्या सामवेत एमआयटीचे विश्वस्त उषा विश्वनाथ कराड, काशीराम कराड, तुळशीराम कराड, सहकार्यकारी विश्वस्त डॉ. सुचित्रा नांगरे हे उपस्थित होते. याप्रसंगी न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, पुरोहित संजय कुलकर्णी, ओंकारेश्वर उटगे, बालाजी कटारे, रोहित उण्णद, सिध्देश्वर हत्तुरे, निखिल पाटील, गोटू माने, बाळासाहेब पोळ, एस. के. स्वामी, शावरेप्पा माणकोजी, सिध्दाराम कल्याणी, महादेव अनगले, धनप्पा उमदी, मल्लिकार्जुन बिराजदार, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, नामा भोसले, बाळासाहेब घाडगे, श्रीनिवास गवंडी, प्रसन्ना बिराजदार, दत्ता माने, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, रमेश हेगडे, महांतेश स्वामी, धनंजय निंबाळकर, समर्थ घाडगे, देवराज हंजगे, अनिल बिराजदार, मल्लिनाथ कोगनुरे, लाला निंबाळकर, कल्याण देशमुख, गोविंदराव शिंदे, भरत राजेगावकर, शुभम भिंगे यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# ड्रोनच्या सहाय्याने पकडली २ कोटींची वीजचोरी

**केडगाव विभागाची धाडसी कामगिरी**
**शिक्रापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल**

✔ सुराज्य/सोलापूर

**वीजबिलाच्या थकबाकीसाठी बंद केलेल्या मीटरला बायपास करुन उच्चदाबाच्या रोहित्राला थेट मोठी केबल जोडून वीजचोरी करणाऱ्या चोराचा महावितरण केडगाव विभागाने ड्रोनच्या सहाय्याने छडा लावला आहे. मुकेश अगरवाल असे या वीजचोराचे नाव असून त्यास महावितरणने २ कोटी ४ लाखांचा दंड ठोठावला आहे. याप्रकरणी शिक्रापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



सणसवाडी (ता. शिरुर) येथे मुकेश ओमप्रकाश अगरवाल (रा. अग्रसेन सोसायटी, कोरेगाव पार्क, पुणे) यांच्या मालकीच्या तीन वेगवेगळ्या कंपन्या आहेत. पैकी मे. थर्मोलाईट पॅकेजिंग इंडिया प्रा.लि व मे. प्रकाश करुगेटेड पुणे प्रा. लि. ह्या दोन उच्चदाबाचे तर मे. भगवान ट्यूब प्रा.लि. हे लघुदाब ग्राहक आहेत. तिन्ही कंपन्या एकाच आवारात व शेजारी-शेजारी आहेत. यामध्ये प्रामुख्याने थर्माकोल व पुठ्ठा बनविण्याचे काम होते. मे. थर्मोलाईट पॅकेजिंग इंडिया प्रा. लि. या ग्राहक जोडणीचा वीजपुरवठा कायमस्वरुपी बंद केला होता तर इतर दोन वीजजोडण्यांचा वीजपुरवठा देखील थकबाकीच्या कारणास्तव तात्पुरता बंदच आहे. महावितरणने वीजपुरवठा बंद केलेला असतानाही वीजपुरवठ्यासाठी उभारण्यात आलेल्या उच्चदाब रोहित्रातून थेट वीजपुरवठा सुरु केल्याची माहिती केडगावचे कार्यकारी अभियंता संदीप दरवडे यांना खबऱ्यामार्फत मिळाली. सदरची वीजचोरी मोठी असल्याने व संबंधित ग्राहकाने गेटवर बंदोबस्त लावून आत जाण्यास मज्जाव केल्याने दरवडे यांनी ही बाब मुख्य अभियंता सुनील पावडे यांच्या कानावर घातली. तेव्हा मुख्य अभियंता पावडे यांनी वीजचोरी उघडकीस आणण्यासाठी ड्रोनची मदत घेण्यास सांगितले. २५ ऑगस्टला संदीप दरवडे आठ जणांच्या पथकासह गेले. कुरिअर पार्सल देण्याच्या निमित्ताने एका दुचाकीवरुन त्यांनी एका मित्राच्यासह आत प्रवेश मिळवला. पुराव्यासाठी ड्रोनद्वारे चित्रिकरण सुरु केले व तोच बाहेर दबा धरुन बसलेल्या टीमने ओळखपत्र दाखवून आत प्रवेश केला आणि वीजचोरीचा पर्दाफाश केला. मे. प्रकाश करुगेटेड पुणे प्रा. लि (ग्रा. क्र. १८४८१९०४९४४०) या ग्राहकाला ४७३२९० युनीट वीजचोरी पोटी १ कोटी ११ लाख १९ हजार ८५७, मे. थर्मोलाईट पॅकेजिंग इंडिया प्रा.लि. (ग्रा.क्र. १८४८१९०२१८९२) या ग्राहकाला २०५६०६ युनीट चोरीचे ५१ लाख ३४ हजार ९७० तर मे. श्री. भगवान ट्यूब प्रा. लि. (ग्रा. क्र. १८४८१९०३३४४०) या ग्राहकाला २३४९६१ युनीट चोरीसाठी ४२ लाख २५ हजार १६४ रुपये असे तीन ग्राहकांचे मिळून २ कोटी ४ लाख ७९ हजार ९८८ रुपये दंडाचे बील कंपनीचे मालक मुकेश ओमप्रकाश अगरवाल यांना देण्यात आले आहे. तसेच कार्यकारी अभियंता दरवडे यांच्या फिर्यादीवरुन भारतीय विद्युत अधिनियम २००३ कलम १३५ व १३८ नुसार शिक्रापूर पोलीस ठाण्यात वीजचोरीचा व वीज यंत्रणेस छेडछाड केल्याचा गुन्हा सुद्धा दाखल करण्यात आला आहे.

मुख्य अभियंता सुनील पावडे, अधीक्षक अभियंता म्हसू मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकारी अभियंता संदीप दरवडे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता किशोर शिंदे, उपकार्यकारी अभियंता नितीन महाजन, सहा. अभियंता गौरी काळंगे व बाळासाहेब टेंगले, कनिष्ठ अभियंता श्रीकांत ताटीकोंडा, जनमित्र विश्वनाथ किंदरे व ज्ञानेश्वर आहिरकर यांनी ही कामगिरी यशस्वी केली. महावितरणने पकडलेल्या या वीजचोरीमुळे वीजचोरांचे धाबे दणाणले आहेत.



## भीमाचे ऊस बील शेतकऱ्यांना त्वरित देण्याची मागणी

✔ सुराज्य/विरवडे बु. : मोहोळ तालुक्यातील टाकळी येथील भीमा सहकारी साखर कारखान्याच्या विद्यमान संचालक मंडळाने अनेक शेतकऱ्यांची एक रुपयाही उसाची बिल दिले नाही यामुळे अनेक शेतकऱ्यावर उपासमारीची वेळ आली आहे. त्वरित उसाचे बिल शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे ग्राहक संरक्षण कक्षाच्यावतीने तसेच शिवसेना मोहोळ तालुक्याच्यावतीने जिल्हाधिकारी सोलापूर यांना निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात दुष्काळ सदृश्य परिस्थितीमुळे अनेक शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती बिकट झाली आहे. अशातच वर्षभर राबराब राबवून पिकवलेल्या उसाचे बिल भीमा सहकारी साखर कारखान्याने थकविल्याने अनेक शेतकऱ्यांसमोर जगावं की मरावं असा प्रश्न निर्माण झाला आहे. मुलांचे शिक्षण, वर्षभरात छोटे-मोठे कार्यक्रम, सण उत्सव साजरे करण्यासाठी शेतकऱ्यांकडे पैसे नसल्याने खासगी सावकारांकडून दीडपट व्याजदराने पैसे उपलब्ध करावे लागत आहे. त्यामुळे भीमा सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाने त्वरित उसाचे बिल शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी अशी मागणी शिवसेना ग्राहक संरक्षण कक्षाचे सोलापूर जिल्हा संघटक सिध्दाराम म्हमाणे यांनी केली आहे. यावेळी शिवसेना मोहोळ तालुका प्रमुख अशोक भोसले, शिवसेना उपजिल्हाप्रमुख संतोष पाटील, ग्राहक संरक्षण कक्षाचे सोलापूर शहर संघटक संतोष घोडके, महिला आघाडी समन्वयक सुशीला जाधव, शिवसेना उपतालुकाप्रमुख विनोद आंबरे, नरसिंग पाटील, विजय पवार, परमेश्वर गव्हाणे, बाहुबली कस्तुरे, शिवरुद्र म्हमाणे, आप्पा शिंदेबंदे, संजय पाटील, हुकुमचंद कस्तुरे, गर्जेद्र पवार, गुरुनाथ राजमाने आदींसह शेतकरी उपस्थित होते.



## समृद्धी राजगुरू हिची जिल्हास्तरीय निवड

✔ सुराज्य/कुर्डूवाडी : क्रीडा व युवक संचनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा विभाग यांच्यामार्फत आयोजित तालुकास्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेमध्ये १७ वयोगट मधून मुलींमध्ये थाळीफेक स्पर्धे त तालुक्यातून प्रथम क्रमांक मिळवून व गोळा फेक या स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवून सोलापूर जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी आदर्श पब्लिक स्कूल विद्यार्थिनी समृद्धी राजकुमार राजगुरू यांची निवड झाली आहे.

## स्वेरी फार्मसीच्या ४ विद्यार्थ्यांची टीसीएस सिग्मा या कंपनीसाठी निवड



✔ सुराज्य/पंढरपूर

टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस सिग्मा तथा टीसीएस 'सिग्मा' या नामांकित कंपनीने घेतलेल्या मुलाखतीत गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसीमधील ४ विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्यूद्वारे निवड करण्यात आली आहे, अशी माहिती संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. बी. पी. रोंगे यांनी दिली.

फार्मसी क्षेत्राशी संबंधीत असलेल्या टीसीएस 'सिग्मा' या नामांकित कंपनीच्या निवड समितीने अंतिम फेरीतून फार्मसी विभागातील दिव्या खंडू नवले, विश्वजीत राजकुमार पाटील, परवेज प्यारेलाल मुजावर व सिध्देश्वर सुनील साखरे या ४ विद्यार्थ्यांची निवड केली आहे. क्लिनिकल डेटा व्यवस्थापन, फार्माकोव्हिजिलन्स, रेग्युलेटरी अफेअर्स, जनरल डोमेन अशा विविध विभागांसाठी ही निवड प्रक्रिया राबविण्यात आली होती. निवड प्रक्रियेकरीता टीसीएस या कंपनीकडून ॲप्टिट्यूड, ग्रुप डिस्कशन व एच. आर. राउंड अशा वेगवेगळ्या स्तरांवर निवड प्रक्रिया राबविण्यात आली होती. विद्यार्थ्यांसाठी ही संधी उपलब्ध व्हावी म्हणून कॉलेजच्यावतीने टीसीएस सिग्मा या कंपनीसोबत समन्वय साधण्यात आला होता व ऑनलाईन पद्धतीने ही निवड प्रक्रिया पार पडली. त्यामधून स्वेरी फार्मसीच्या ४ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

विद्यार्थ्यांचे परिश्रम, शिक्षकांचे प्रयत्न आणि स्वेरीतील शैक्षणिक कल्चर यामुळेच स्वेरीतील विद्यार्थ्यांना नोकरीच्या भरपूर संधी उपलब्ध होत आहेत आणि त्यातून स्वेरीवर असलेला पालकांचा विश्वास आणखी दृढ होत आहे.



## लक्ष पुष्पार्चनाने फिटले डोळ्याचे पारणे

**श्री राघवेंद्र स्वामी आराधना महोत्सव**

✔ सुराज्य/सोलापूर

वृंदावनाला केलेली नयनरम्य सजावट आणि विविध रंगी, विविध प्रकारच्या फुलांच्या सहाय्याने केलेल्या लक्ष पुष्पार्चनाने भाविकांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. निमित्त होते श्री रायवेंद्र स्वामी मठाच्यावतीने आयोजित आराधना महोत्सवाचे.

जगद्गुरु श्री मन्मध्वाचार्य मूलमहासंस्थान श्री राघवेंद्र स्वामी मठ मंत्रालयम्च्या सोलापूर शाखेच्यावतीने तीन दिवसीय आराधना महोत्सवातील दुसऱ्या दिवशी शुक्रवारी लक्ष पुष्पार्चन व तुळशी अर्चना विधी करण्यात आला. सोलापुरातील आराधनेचे यंदाचे ५० वे वर्ष आहे.

शुक्रवारी सकाळी अष्टोत्तर पारायण, पाद्यपूजा करण्यात आली. यानंतर लक्ष पुष्पार्चन व तुळशी अर्चना विधी झाला. याप्रसंगी हजारो भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. लक्ष पुष्पार्चन व तुळशी अर्चना विधीनंतर दर्शनासाठी राघवेंद्र नगर आणि काळजापूर मारुतीजवळील दोन्ही मठांमध्ये भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

सायंकाळी गायक प्रशांत देशपांडे आणि सहकाऱ्यांचा भक्ती गीतांचा कार्यक्रम सादर झाला.

### आराधना महोत्सवात आज महारथोत्सव

श्री रायवेंद्र स्वामी आराधना महोत्सवाचा आज शनिवारी समारोप होणार आहे. यात सकाळी ११ वाजता महारथोत्सव होणार असून याप्रसंगी श्री राघवेंद्र स्वामी यांची पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. भाविकांनी याप्रसंगी उपस्थित रहावे, असे आवाहन श्री रायवेंद्र स्वामी मठातर्फे करण्यात आले आहे.

## 'खोकेधारकांवरील अतिक्रमण मोहीम तत्काळ बंद करावी'

✔ सुराज्य/सोलापूर



चारचाकी फेरीवाले व लहान व्यावसायिकांना विस्थापित होऊ देणार नाही. यांच्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल पालिकेकडे सादर झालेले असून त्याची तात्काळ अंमलबजावणी करावी आणि हे जुलमी अतिक्रमण रोखण्यात यावे अन्यथा महापालिकेवर आंदोलन करण्याचा पवित्रा युनियनच्या माध्यमातून होईल असा इशारा ज्येष्ठनेते माजी आमदार कॉ. नरसय्या आडम यांनी आयुक्तांना निवेदनाद्वारे दिला.

स्वयंरोजगार करण्यासाठी रस्त्याच्या कडेला व लहान व्यवसाय, चारचाकी फेरीवाले, किरकोळ फळ भाजी विक्रेते यांचे पुनर्वसन होण्याकरिता केंद्र व राज्य सरकार फेरीवाला धोरण क तयार करण्यात आले. याबाबत २८ डिसेंबर २०२१ रोजी तत्कालीन आयुक्त पी.शिवशंकर यांच्या अध्यक्षतेखाली सोलापूर शहर फेरीवाला समितीची बैठक पार पडली. या बैठकीत उस्मानाबाद च्या ओएसीस या निमशासकीय संस्थेकडून करण्यात आलेल्या अहवालानुसार ६००० फेरीवाल्यांचे ऑनलाइन सर्व्हेक्षण करण्यात आले असून त्याची यादी प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार त्यास तत्वतः मंजुरी देऊन महापालिका मार्फत हॉकर्स झोनची निर्मिती करण्यासाठी निवड प्रक्रिया करण्यात यावी. तोपर्यंत चारचाकी फेरीवाले, रस्त्याच्या कडेला बसणाऱ्या व्यावसायिकांचे अतिक्रमण थांबविण्यात यावे अशी मागणी कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर महानगरपालिका आयुक्त शीतल तेली यांच्याकडे केली. यावेळी बावटा फेरीवाले, चारचाकी व खोकेधारक श्रमिक संघटना मार्फत शिष्टमंडळाद्वारे निवेदन देण्यात आले.

## हातातील लॅपटॉपची बॅग पळविली

✔ सुराज्य/सोलापूर : विजयपूर रोडवरील निरापाम सोसायटीतून चोरट्याने लॅपटॉप चोरून नेल्याची फिर्याद राम ज्ञानोबा सुरवसे यांनी विजापूर नाका पोलिसांत दिली. २९ ऑगस्ट रोजी रात्री पावणेनऊच्या सुमारास घरासमोरील पार्किंगमध्ये गाडी पार्क करून हातातील बॅग घेऊन घराकडे जाताना मागून आलेल्या एका अनोळखी व्यक्तीने हातातील बॅग हिसकावून पळवून नेली, असेही फिर्यादी सुरवसे यांनी पोलिसांना सांगितले. पोलीस उपनिरीक्षक गायकवाड तपास करीत आहेत.

## सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन

✔ सुराज्य/सोलापूर

शासन परिपत्रक दि. २६ सप्टें. २०१२ अन्वये, जिल्हास्तरीय लोकशाही दिन महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित करण्यात येतो. या दिवशी जनतेच्या तक्रारी गाऱ्हाणी ऐकण्याकरीता त्या त्या विभागातील विभागप्रमुखांनी उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

तरी माहे सप्टेंबर २०२३ चा लोकशाही दिन दि. ४ सप्टेंबर २०२३ रोजी आयोजित केला असून सर्व विभागप्रमुखांनी आपल्याकडील मागील महिन्यातील प्रलंबित निवेदन/अर्ज माहिती अधिकार अधि. २००५ अंतर्गत प्राप्त अर्ज, आपले सरकार पोर्टलवरील प्रलंबित तक्रारीवर केलेली कार्यवाही इ. माहितीसह सकाळी १० वाजता नवीन जिल्हाधिकारी कार्यालय सात रस्ता, सोलापूर येथे उपस्थित रहावे. तसेच या दिवशी गैरहजर राहणार असल्यास त्याबाबत जिल्हाधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांनी कळवले आहे.



## पेशी बंड करून उठतात तेव्हा कॅन्सरला सुरुवात होते : डॉ. कुमठेकर

✔ सुराज्य/सोलापूर

शरीरातल्या प्रत्येक पेशींनी त्यांचे नेमून दिलेले काम करणं अपेक्षित असतं. शरीरातल्या पेशी जेव्हा नियम मोडायला लागतात, पेशी मनमानी करायला सुरुवात करतात. शरीरात जखमा होतात किंवा गाठी तयार व्हायला लागतात तेव्हा त्या व्यक्तीच्या शरीरात कॅन्सरची सुरुवात व्हायला लागते. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालात २०२५ पर्यंत भारतातल्या प्रत्येक कुटुंबातील एका व्यक्तीला कॅन्सर झालेला असेल असे भाकीत करण्यात आले आहे, असे डॉ. शिरीष कुमठेकर यांनी सांगितले.

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेच्या नरोत्तम सेक्सरिया फाउंडेशन व सोलापूर कॅन्सर सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने कॅन्सर क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकरिता कॅन्सरविषयी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्या प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे मार्गदर्शक डॉ. श्रीकांत येळेगावकर हे होते.

यावेळी सारथी युथ फाऊंडेशनचे सचिव रामचंद्र वाघमारे, फॅमिली प्लॅनिंगच्या कार्यकारणी सदस्या डॉ. विजया महाजन, डॉ. रामचंद्र सलगरे, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, डॉ. कविता चंडक, डॉ. विजयालक्ष्मी होमकर, हनमंतू सलगर आदी उपस्थित होते.

सारथी युथ फाऊंडेशनचे रामचंद्र वाघमारे टीसीसीपी कार्यक्रमाबद्दल बोलताना म्हणाले की, 'जन्माच्या ठिकाणापासून ते स्मशानभूमीपर्यंत सर्व ठिकाणी तंबाखूजन्य पदार्थ सहजासहजी मिळतात. तंबाखूजन्य सेवन करण्यामध्ये युवा वर्ग मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे कॅन्सरचा धोका हा या गटाला अधिक आहे. किशोरावस्था व तारुण्यावस्थेत व्यसनाच्या आहारी जाण्याचे प्रमाण जास्त असते आणि या वयातच योग्य समुपदेशन आणि पाठपुरावा केल्यास तंबाखूचे व्यसन सुटू शकते. त्यासाठी कर्मचाऱ्यांनी जनजागृती आणि पाठपुरावा यावर भर द्यावा.

सूत्रसंचालन वीरेंद्र परदेशी यांनी केले, स्वागत व प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी केले तर आभार डॉ. विजया महाजन यांनी मानले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी पियुषा देशपांडे, समुपदेशिका रोजमेरी गायकवाड, विजय शिंदे, आकाश गायकवाड, कल्पना गडगडे, रेखा राठोड, मिथुन भोसले यांनी परिश्रम घेतले.

# सरसकट कर्ज व वीज बील माफीसाठी जनशक्ती शेतकरी संघटना रस्त्यावर उतरणार

✔ सुराज्य/सोलापूर

**जिल्ह्यात महिन्याभरापासून पावसाने दडी मारल्याने खरिपाची पिके वाचविण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड सुरू आहे. राज्य शासनाने लक्ष घालून तातडीने चारा डेपो, पाण्याचे टँकर सुरू करावेत, वन विभागाकडून मेंढपाळांना चराईसाठी परवानगी मिळावी, पावसाअभावी करपून गेलेल्या खरिपातील सर्व पिकांना सरसकट विमा मिळावा, सरसकट वीज बिल माफ करावे अन्यथा तीव्र आंदोलन करून सरकारला सळो की पळो करून सोडू, असा इशारा जनशक्ती शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अतुल खुपसे-पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिला.**

जिल्ह्यात महिन्याभरापासून पावसाने दडी मारल्याने खरिपाची पिके वाचविण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड सुरू आहे. पाऊस नसल्याने दुष्काळाच्या झळा असह्य होत आहेत. पाण्याची तीव्र टंचाई आहे. मेंढपाळ तसेच पशुपालक शेतकऱ्यांपुढे चाऱ्याचा प्रश्न गंभीर आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक चक्र कोलमडले आहे. याकडे जिल्ह्यातील आमदार खासदारांचे दुर्लक्ष होत आहे. शासनही याबद्दल काही बोलण्यास तयार नाही, असा आरोप खुपसे-पाटील यांनी केला आहे.

पावसाअभावी माळशिरस, अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, मंगळवेढा, माढा, करमाळा आदी तालुक्यांमधील परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. बळीराजाचे पावसासाठी आकाशाकडे डोळे लागलेले असतानाच उजनी धरणात पुरेसा पाणीसाठा नसल्याने शेतीसाठी पाणी सोडणे कठीण झाले आहे. शेतात पीक उगवले नसल्याने दारातील जनावरे जगवायची कशी, असा प्रश्न सर्वांना भेडसावत आहे. त्यासाठी शासनाने त्वरित चारा डेपो-छावण्या



सुरू कराव्यात, कांद्यावरील निर्यातीवर ४० टक्के वाढ केली आहे ते शुल्क कमी करावे, शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी, वीज बिल माफ करावे, शेतात पीक उगवले नसल्याने दारातील जनावरे जगवायची कशी, असा प्रश्न सर्वांना भेडसावत आहे. त्यासाठी शासनाने त्वरित चारा डेपो-छावण्या सुरू कराव्यात, कांद्यावरील निर्यातीवर ४० टक्के वाढ केली आहे ते शुल्क कमी करावे, शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी, वीज बिल माफ करावे, विमानतळासाठी संपादित केलेल्या जमिनीचा योग्य मोबदला द्यावा, शेतकऱ्यांचे पुनर्वसन अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची भरघोस भरपाई त्वरित देण्यात यावी, गायरान वास्तव्यास असणाऱ्यांना घरकुल देण्यात यावे, दुबार पेरणीसाठी बी- बियाणे मोफत द्यावी, शेतकऱ्यांना मोफत पीक विमा योजना लागू करून जाचक नियम शिथिल करावेत, शेतमजुरांच्या सुशिक्षित बेरोजगार मुलांना अर्थसाह्य योजना राबवावी आदी मागण्या जनशक्ती शेतकरी संघटनेच्यावतीने करण्यात येत आहेत. या मागण्यांची लवकरात लवकर पूर्तता न झाल्यास १२ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी यांच्या निवासस्थानी आंदोलन करून शासनाला सळो की पळो करून सोडणार असल्याचे खुपसे-पाटील यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेत औदुंबर सावंत, निखिल नागणे उपस्थित होते.

# नुकसानीपोटी आगाऊ २५ टक्के रक्कम द्या

## ५ मंडळामध्ये ५०% पेक्षा अधिक नुकसान झालेल्या पिकाचा सर्वे

✔ सुराज्य/सांगोला

**सलग २१ दिवस पावसाचा खंड असलेल्या एकुण ५ मंडळामध्ये ५०% पेक्षा अधिक नुकसान झालेल्या पिकाचा सर्वे करून त्यांना नुकसानापोटी आगाऊ २५ टक्के रक्कम देण्यासाठी शासनाकडून सर्वेक्षण सुरू आहे. यामध्ये महूद, शिवणे, जवळा, कोळा व घेरडी या मंडल चा समावेश करण्यात आला आहे.**

तर पेरणीपूर्वी व पेरणीनंतर आधी मधी पाऊस पडल्याचे कारण पुढे करीत, संगेवाडी, सांगोला, नाझरा, हातीद आणि सोनंद हे मंडल वगळण्यात आले आहेत.यामुळे तालुक्यातील इतर पाच मंडळ मधील सर्व शेतकऱ्यांवर हा सरासर अन्याय असल्याची भावना या परिसरातील शेतकऱ्यांमधून व्यक्त होत असून, निसर्गाच्या लहरीपणामुळे १०० मीटर अंतरावर पाऊस आहे, तर १०० मीटर अंतरावर पाऊस नाही अशी परिस्थिती असताना, शासनाने हा निकष कोणत्या आधारे लावला असा संतप्त सवाल करीत तालुक्यातील सर्वच मंडळांचा यामध्ये सहभाग करावा अशी आक्रमक मागणी वगळण्यात आलेल्या मंडळातील शेतकऱ्यांमधून करण्यात येत आहे.

हंगामामध्ये प्रतिकूल परिस्थिती या नुसार १५ जुलै नंतर ज्या मंडळामध्ये पेरणीपूर्वी पंधरा दिवसांनी व पेरणी नंतर पंधरा दिवस पावसाचा खंड पडला अर्थात सर्वसाधारण २१ दिवसाचा खंड पडल्यानंतर हंगामातील प्रतिकूलपरिस्थितीसाठी जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार ५% क्षेत्राचे सर्वे क्षण केले जाणार आहे.

यामध्ये महूद, शिवणे, जवळा, कोळा व घेरडी या मंडल चा समावेश करण्यात आला आहे. कृषी विभागाच्या नियोजनानुसार सांगोला तालुक्यात सद्यपरिस्थितीला सर्वेक्षण सुरू करण्यात आले असल्याचे सांगण्यात येत आहे. परंतु सांगोला तालुक्यात चालू वर्षी खरीप हंगामात पेरण्या करण्याइतपत पाऊस झाला नाही.



सांगोला शहर आणि तालुक्यात आज अखेर दमदार पावसाचे आगमन झालेले नाही. तालुक्यातील प्रत्येक मंडळामध्ये हलका ते मध्यम स्वरूपाचापाऊस झाला आहे. परिणामी आज सर्वत्र पाणीटंचाई जाणवत असून, पाण्याच्या पातळ्यांनी तळ गाठला असल्याने तालुक्यातील काही भागांमध्ये टँकर द्वारे पाणीपुरवठा सुरू आहे.

तालुक्यातील नागरिकांची तहान जीवन प्राधिकरण अर्थात शिरभावी पाणीपुरवठा योजनेवर आणि टँकरवर अवलंबून आहे. पिण्याच्या पाण्यासाठी ही परिस्थिती असेल तर शेतातील पिकांची अवस्था काय असेल याचा विचार संबंधित कृषीविभागाने केलेला नाही. यामुळे तालुक्यातील पाच मंडळ वगळण्यात आले असल्याने, कार्यालयात बसून तालुक्याचा आढावा समजत नसतो. कृषी विभागाने अगोदर गावागावात जाऊन पिकांची पाहणी करावी.

मगच आमचे मंडळ वगळावे याबाबत लोकप्रतिनिधींनी लक्ष घालावे अशी मागणी संगेवाडी, सांगोला, नाझरा, हातीद आणि सोनंद हे मंडल क्षेत्रातील शेतकऱ्यांमधून जोर धरत आह



## कार घेऊन पळालेल्या आरोपींना ४८ तासात अटक

✔ **अक्कलकोट** : बणजगोळ ता.अक्कलकोट येथे कार आल्यावर प्रवाशी म्हणून भाड्याने कार बुक केलेल्या प्रवाशांनी चालक लघुशंका करिता थांबले असता चालकास ढकलुन देऊन मारहाण करून कार घेऊन पळुन गेले.आरोपी प्रवाशी निसार जमादार, राज नागणसुरे, संदीप आवटे व समीर भालके यांच्याविरूध्द गुन्हा दाखल झाला होता. ईर्टीका नं. एम. एच. १२ व्ही. क्यु. ३३८५ चा चालक विजय गोडसे यांनी फिर्याद दिली होती. पोलीसांनी तत्परतेने हालचाली करत आरोपी उमरगा जि. उस्मानाबादयेथे जावुन आरोपी राम नागणसुरे व संदीप आवटे यांना ईर्टिगा कारसह तपासकामी अटक केली. आरोपी राम नागणसुरे हा उमरगा पोलीस ठाणेचे रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार आहे. त्यांना ताब्यात घेवून त्यांचे ताब्यात असलेली सुमारे सात लाख रूपये किंमतीची ईर्टीका चारचाकी गाडी तपासकामी ताब्यात घेतली. सदर गुन्हयातील इतर आरोपी निसार जमादार व समीर भालके हे सुध्या नळदुर्ग पोलीस ठाणे, व उमरगा पोलीस ठाणेचे रेकॉर्डवरील गुन्हेगार असून त्यांचा शोध सुरू आहे.सदरची कामगिरी ग्रामीण पोलीस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधिक्षक हिम्मंत जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी विलास यामावार, पोलीस निरीक्षक जितेंद्र कोळी यांचे मार्गदर्शनाखाली तपासिक अंमलदार सपोनि बी. बी. नाईकवाडे, पोहेकॉ शरद चव्हाण, पोहेकॉ अंगद गिते, पोकॉ धोंडीबा ठेंगळे, पोकॉ राम चौधरी, पोकॉ पिंजारी पोहेकॉ विपीन सुरवसे यांनी ही कामगिरी केली.



## संगमच्या महिला ग्रा.प. सदस्यांचा ठाकरे यांच्या समवेत रक्षाबंधन

✔ **माळीनगर** : शिवसेनेचे श्रद्धास्थान मातोश्री येथे संगम ता. माळशिरस जि.सोलापूरच्या नवनिर्वाचित ग्रामपंचायत सदस्या जयश्री गणेश इंगळे यांनी शिवसेना पक्षप्रमुख मा. उद्धवसाहेब ठाकरे यांना शिवसेना जिल्हाप्रमुख परभणी मा.सखुबाई लटपटे. व जिल्हाप्रमुख पुणे मा.निताताई भोसले ,श्री गणेश इंगळे व आदित्य इंगळे यांच्या उपस्थितीत रक्षाबंधन निमित्त राखी बांधून औक्षण केले. यावेळी आपल्या भावाच्या पाठीशी महाराष्ट्रातील प्रत्येक रणरागिनी उभे असल्याचे चित्र निदर्शनास आले.उद्धव बाळासाहेब ठाकरे हे नेत्यांना वेळ देत नाहीत ,भेटत नाहीत, अशी कारणे सांगून खोके घेऊन बोके झालेल्या गद्दारांना संगमच्या रणरागिनी, नवनिर्वाचित ग्रामपंचायत सदस्य सौ. जयश्री गणेश इंगळे यांनी स्वतः मा.उद्धव ठाकरे यांना भेटून राखी बांधून, गद्दारांना चपराकच लगावली आहे.



## नरेगल यांनी स्वखर्चाने दिले ५० सिमेंटचे विश्रांती बाकडे

✔ **अक्कलकोट** : श्रीक्षेत्र अक्कलकोट नजीक असलेल्या समर्थनगर येथील वॉर्ड क्र.३ चे मोनेश्वर नरेगल यांनी स्वखर्चाने वार्डाच्या विकासात भर पडण्याकामी ग्रामस्थांच्या सोयी करिता ठिकठिकाणी ५० सिमेंट विश्रांती बाकडे देवून समाजापुढे आदर्शवत ठरला आहे. मोनेश्वर हे ग्रामपंचायत सदस्य होवून चार वर्षे पूर्ण होत आहेत. दरम्यान गेल्या चार वर्षामध्ये वृक्षारोपण, जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप केले. अनावश्यक खर्चाला फाटा देवून वार्डा रहिवाशांची सोय व्हावी. याद्दष्टीने आजवर मोनेश्वर नरेगल यांनी कार्य केलेले आहे. मोनेश्वर नेरगल यांनी केवळ आपल्या वार्डापुरते न राहता समर्थनगरातील उपनगरामधील आबावाडी, जेऊर रोड, समता नगर, गुरुमित्र सोसायटी, बॅगेहळ्ळी रोड दत्त मंदिर, स्वागत नगर, राजे प्रतिष्ठान आदीसह विविध ठिकाणी सदरचे उपक्रम त्यांनी राबविलेले आहे. यावेळी भाजपाचे ज्येष्ठ नेते उदय नगरेगल, ग्रा.पं.सदस्य सतिश खराडे, गोपाळ खराडे, किरण चव्हाण, अक्षय दळवी, प्रसाद साठे, संदीप बिराजदार, सोलनकर, अनिल बणजगोळ, समर्थ घाटगे आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते.



## ७५ वर्षे पूर्ण झालेल्या ज्येष्ठ व्यक्तींचा सत्कार

✔ **अक्कलकोट** : भारतीय स्वातंत्र्याच्या ७५ व्या अमृत महोत्सवाच्या समारोप निमित्त अक्कलकोट ते सोलापूर रोडवरील श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्टच्या वतीने माजी सैनिक, पोलीस कर्मचारी सेवा निवृत्त, ७५ वर्षे पूर्ण झालेल्या ज्येष्ठ व्यक्तींचा सत्कार डॉ. अभिनव बसवलिंग महाराज तुप्पीन.मठ नागणसूर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी निवृत्त शिक्षक धर्मसाले, मेजर निवृत्त वाडे, सेवा निवृत्त पोलिस सत्तार शेख,विजय काकडे, संभाजी पडवळकर, किरण जाधव, बाबूराव हंचाटे,पांडुरंग जामदार,शकुंतला कटारे,यांचे सन्मान करण्यात आला.यावेळी मुरारी शिंदे, श्रीकांत झिपरे, राजशेखर साखरे, साठे, स्वामीनाथ हेगडे, उषा हंचाटे,अर्चना, सुरवसे, आदीजण उपस्थित होते. याप्रसंगी स्वामी समर्थ सेवाश्रम ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र महाराज सुरवसे यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन उषा हंचाटे यांनी तर आभार आश्रमाचे अध्यक्ष राजेंद्र सुरवसे यांनी मानले.

## कुर्डुवाडी पोलिसाची बेकायदेशीर वाळू उपसा करण्यांवर कारवाई

✔ सुराज्य/कुर्डूवाडी

शिंगेवाडी ता.माढा गावातील पाणीपुरवठा विहिरीजवळ सीमा नदी पात्रात बिगर नंबरचा ट्रॅक्टर वर ट्रॉली बिगर नंबरची या वाहनातून विनापरवाना सीना नदी पात्रातून वाळू उपसा करणाऱ्यांवर कुर्डूवाडी पोलिसांनी कारवाई करत ट्रॅक्टर व उपसा केलेली वाळू जप्त केली आहे. पोलिसांनी दि.१ सप्टेंबर रोजी रात्री २.१५ वाजताच्या सुमारास शिंगेवाडी ता. माढा येथील सीना नदी पात्रात कारवाई केली. कुर्डुवाडी पोलीस ठाण्यात पोलिस नाईक रहीम रमजान मुलाणी यांनी फिर्याद दाखल केली आहे.

या कारवाईत अभिजीत संजीवन चौथमहाल वय २९ रा. कवठे भिमनगर,ता.परांडा जि. धाराशिव असे अटक करण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव आहे. हकीकत अशी शिंगेवाडी ता. माढा गावातील पाणीपुरवठा विहिरीजवळ सीमा नदी पात्रात बिगर नंबरचा ट्रॅक्टर वर ट्रॉली बिगर नंबरची या वाहनातून शासनाची कोणतीही परवानगी न घेता विनापरवाना सीना नदी पात्रातून पर्यावरणाचा हनी पोहचवत वैद्य रित्या वाळू उपसा करून चोरून वाहतूक करीत असताना पोलिसांनी त्यांच्यावर कारवाई केली.

या कारवाईत ६ लाख किमतीचा एक लाल रंगाचा स्वराज कंपनीचा बिगर नंबरचा ट्रॅक्टर व बिगर नंबरची लाल रंगाची ट्रॉली व १० हजार रुपयांची एक ब्रास वाळू जप्त करण्यात आली आहे.

## अक्कलकोट बसस्थानकासमोर वाहतुकीची कोंडा कोंडी

✔ सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट बस स्थानका समोर अवैध वाहतूक करणाऱ्या जीप व रिक्षामुळे दिवसभरात वारंवार वाहतूक कोंडी होत असतानाही पोलीसांनी वरकमाई साठी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्यामुळे नागरीकातून संताप व्यक्त केला जात आहे.

अक्कलकोट बस स्थानकास फळ विक्रेते, गॅरेज वाले व वेल्डिंग वाल्यांच्या अतिक्रमणाने चोहोबाजूने व्यापल्यामुळे बसस्थानकातून बस बाहेर निघता निघत नाही, त्यात बसस्थानका समोरील बाजूस व आतील बाजूस अवैध वाहतूक करणारे जिप, रिक्षावाले बिनधास्त वावरतात, प्रवांशी भरत असतात. मनमानी तिकडे आपले वाहन लाऊन अवैध प्रवासी वाहतूक करीत असतात या मुळे बस स्थानकातून बस बाहेर काढताना चालक व वाहकांना नाकी नऊ येत असते, समोर लावलेली वाहन काढण्यास सांगितले असता बसच्या वाहक चालकांना आरवाच्य भाषेत शिवी गाळ करणे, मारा मारी करणे आदी प्रकार घडत असते.



या अवैध वाहतूक करणारे जीप रिक्षा मुळे बस स्थानका समोर दिवस भरात अनेक वेळा वाहतूक कोंडी होत असते. या ठीकाणी एक ही वाहतूक पोलीस, ट्राफिक पोलीस नसतो. बस स्थानकात महीन्यातून किमान दोन तीन वेळा प्रवाशाचे पाकिट मारला जातो, मणी मंगळसूत्र, सोने चैन व टू व्हीलर चोरी होत असते. तीथे पोलीस बंदोबस्त असणे अपेक्षीत असताना वरकमाई साठी उत्तर पोलीस ठाण्याच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडुन पोलीस बंदोबस्त ठेवला जात नसल्याने नागरीकातून मोठी ओरड होत आहे.

वारंवार होत असलेल्या वाहतूक कोंडी बाबत परिसरातील नागरीक वारंवार तोंडी तक्रार करून पोलीस दखल घेत नसल्याने तक्रार तरी कोणाकडे करावे असे संताप नागरिकांतून व्यक्त केला जात आहे.



## मंगळवेढा उपसा सिंचन योजनेसाठी पाटलांनी घेतली अजितदादांची भेट

✔ सुराज्य/पंढरपूर

मंगळवेढ्यातील ३५ गावच्या उपसा सिंचन योजना गेले अनेक वर्षांपासून शासनस्तरावर प्रलंबित आहे. पाण्याचा प्रश्न कायमचा सोडवण्याच्या मागण्यांसाठी श्री विठ्ठल सहकरी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी दि.३१ ऑगस्ट रोजी मुंबई येथील सह्याद्री अतिथी गृह येथे महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार यांना भेटून उपसा सिंचन तात्काळ मार्गी लावण्याची विनंती केली तसेच मंगळवेढातील महात्मा बसवेश्वर स्मारकासाठी निधी मागणीचे निवेदन ही दिले आहे.

मंगळवेढातील ३५ गावांपैकी २४ गावांची उपसा सिंचन योजना अंतिम टप्प्यात असून उर्वरित गावे तांत्रिक बाबींमुळे शासनाच्या लाल फितीत अडकल्या असल्याने उपसा सिंचन योजनातील त्रुटी पूर्ण करून अर्थमंत्री या नात्याने उपसा सिंचन योजनेसाठी भरघोस निधी मंजूर करावा अशी मागणी अभिजीत पाटील यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे केली. तसेच स्व.आमदार भारतनाना भालके यांनी उपसा सिंचन योजनेसाठी प्रयत्न केले होते. ही योजना मार्गी लावून स्व. भारतनाना भालके यांना श्रद्धांजली अर्पण करण्याची विनंती अभिजीत पाटील यांनी व्यक्त केली.

तसेच मंगळवेढा ही संतांची भूमी म्हणून ओळखली जाते. महात्मा बसवेश्वर हे समस्त महाराष्ट्र व कर्नाटकातील सर्वसामान्यांचे व लिंगायत समाजाचे श्रद्धास्थान आहेत. मंगळवेढा येथे ३१वर्ष महात्मा बसवेश्वरांचे वास्तव असून मंगळवेढा भूमी पावन आहे.

महात्मा बसवेश्वर स्मारकांसाठी महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळात अर्थसंकल्पात स्मारकाची घोषणा झाली असून अद्याप स्मारकास निधी उपलब्ध झालेला नाही. तरी त्वरित निधी उपलब्ध करून प्रत्यक्ष कामास सुरुवात व्हावी, अशी देखील मागणी केली आहे.

यावेळी गेले अनेक वर्ष पाणी प्रश्नांसाठी अविरत लढा देणारे पाणी संघर्ष समितीचे अध्यक्ष श्री.पांडुरंग चौगुले, सरपंच अर्जुन खांडेकर, भिमराव मोरेसर पाटकळ, पांडुरंग जावळे हे ही सह्याद्री अतिथीगृह मुंबई येथे उपस्थित होते..

## फसवणूक प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल

✔ सुराज्य/सोलापूर

ठाकूर इलेक्ट्रिकल्स एंड इंजिनिअर्स प्रा.लि. या कंपनीचे इंजिनिअर विशाल सिद्राम ढोबळे याने धाराशीव येथे महावितरणकडून टेंडर मिळाले असून ते काम सबकॉन्ट्रॅक्टरद्वारे पूर्ण केल्याचे भासविले. त्यानंतर बनावट पावत्या देऊन तबबल ३४ लाख ६० हजार ६४६ रुपयाला फसविल्याप्रकरणी शोभाकुमार रूदल ठाकूर (रा. उमा सहकारी गृहनिर्माण संस्था, जुनी मिल कंपाउंड, मुरारजी पेठ) यांनी फौजदार चावडी पोलिसांत फिर्याद दिली.

फिर्यादी शोभाकुमार रूदल यांची ठाकूर इलेक्ट्रिकल्स एंड इंजिनिअर्स प्रा. लि. नावाची कंपनी आहे. त्यातून महावितरणला लागणारे साहित्य पुरविले जाते. १ डिसेंबर २०१९ ते ३० मे २०२२ या काळात विशाल सिद्राम ढोबळे (रा. निराळे वस्ती, मुरारजी पेठ) व तन्वीर कासीम सय्यद (रा. सहारा नगर, होटगी रोड) या दोघांनी संगनमत करून ती रक्कम संबंधित ठेकेदाराच्या बँक खात्यावर जमा करून कंपनीची फसवणूक केल्याचेही फिर्यादीत नमूद आहे.



## नृसिंह गणेश मित्र मंडळाच्या अध्यक्षपदी सुशील महामुनी

✔ सुराज्य/पिलीव

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील नरसिंह गणेश मित्र मंडळाच्या अध्यक्षपदी सुशील महामुनी ,उपाध्यक्षपदी ओंकार स्वामी तर कार्याध्यक्षपदी उमेश देशमुख ,खजिनदारपदी विवेक काळे ,सचिव पदी विनायक देशमुख ,सहसचिव पदी अतुल सातपुते मिरवणूक प्रमुख म्हणून प्रथमेश कलढोणे व योगेश देशमुख यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

सालाबाद प्रमाणे चालू वर्षीही नरसिंह गणेश मित्र मंडळाची पदाधिकारी व कार्यकारीणी निवडीची बैठक मंडळाचे कार्याध्यक्ष उमेश देशमुख यांच्या अध्यक्षस्थेखाली व संस्थापक हरिहर नंदन रवी महाराज पिलीवकर यांच्या मार्गदर्शनाखाली होऊन पदाधिकारी व कार्यकारिणीची निवड करण्यात आली. मंडळाचे संस्थापक हरिहर नंदन रवी महाराज पिलीवकर यांच्या मार्गदर्शनाखाली चालू वर्षी गणेश मंडळाच्या वतीने पारंपारिक पद्धतीचे खेळ लोककला ,सांस्कृतिक कार्यक्रम तसेच मिरवणुकीसमोर मंडळाच्या मुलांनी बसवलेल्या विविध गीतावरील देखावे नृत्य पारंपारिक नृत्य पारंपारिक वाद्य आधी सादर करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला सूत्रसंचालन आभार प्रदर्शन व बैठकीचे नियोजन कार्याध्यक्ष उमेश देशमुख व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले आभार प्रदर्शन नूतन अध्यक्ष सुशील महामुनी यांनी व्यक्त केले.

मंडळाची कार्यकारणी पुढील प्रमाणे : संस्थापक हरिहरनंदन रवी महाराज पिलीवकर ,अध्यक्ष =सुशील महामुनी, उपाध्यक्ष= ओंकार स्वामी, कार्याध्यक्ष उमेश देशमुख, खजिनदार =विवेक काळे, सचिव - विनायक देशमुख, सह सचिव अतुल सातपुते, मिरवणूक प्रमुख प्रथमेश कलढोणे, योगेश देशमुख.

# अपघात जिवावर बेतला; तरुण झाला दिव्यांग

✔ सुराज्य/कुर्डूवाडी

**कुर्डूवाडी- शेटफळ रोडवरील नवीन पुलामध्ये भगदाड पडल्याने हा पूल वाहतुकीसाठी धोकादायक बनला असताना याची दुरुस्ती करणे ऐवजी पुलाच्या दोन्ही बाजूला गतिरोधक करण्यात आल्यामुळे या झालेल्या अपघातात २८ वर्षाचा तरुणाला कायमचे अपंगत्व आले आहे. या जबाबदार अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी नागरिकातून होत आहे.**

कुर्डूवाडी -पंढरपूर रस्ता नुकताच कॉंक्रिटीकरण करण्यात आले. यादरम्यान कुर्डूवाडी शेटफळ रोडला कुर्डूवाडी पासून एक किलोमीटर अंतरावर ओढ्यावर नवीन पूल बांधण्यात आला मात्र निकृष्ट दर्जाचा पूल बांधण्यात आल्यामुळे पुलाच्या मध्यभागील स्लॅपला रस्त्याच्या मध्यभागी भगदाड पडले आहे. अनेक वेळा याबाबत वाहतूकदार व नागरिकांनी या पुलाची स्वताहून दुरुस्ती केले व संबंधित अधिकाऱ्यांना माहिती दिली आहे. प्रशासनाने पूल दुरुस्त करण्याऐवजी पुलाच्या दोन्ही बाजूला बेकायदेशीर गतिरोधक करुन आपली जबाबदारी झटकली आहे. गतिरोधक केले मात्र कोणतेही पांढरे पट्टे किंवा कोणताही माहिती फलक लावण्यात आला नाही. यामुळे या ठिकाणी अपघात वाढले आहेत.



तर कुर्डूवाडी शेटफळ रस्त्या दरम्यान अनेक ठिकाणी अर्धवट कामे आहेत. लऊळ गावाजवळील पुलाचे काम व बाबी ता. माढा येथे रस्त्याचे काम पूर्ण झाले नाही. यामुळे नागरिकांना रस्त्यांचे अर्धवट कामाचा अंदाज येत नसल्यामुळे वाहनाचे अपघात वाढले आहेत.

दि.२९ रोजी पुलावजळ गतिरोधक न दिसल्यामुळे चारचाकी वाहनाने अचानक ब्रेक दाबल्यामुळे पाठीमागून दुचाकीवर येणारा तरुणाची कारला पाठीमागून जोरदार धडक दिल्यामुळे अमोल शंकर गायकवाड वय १८ रा. लऊळ ता. माढा याचा डाव्या पायाच्या गुडघ्या खालील पायाचा तुकडा पडला आहे. यामुळे तरुणाला कायमचे अपंगत्व आले आहे. या बेकायदेशीर गतिरोधक तयार करणाऱ्या प्रशासनाच्या संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी होत आहे.

# ‘इंडिया’कडून केंद्रीय समन्वय समितीची घोषणा

✔ सुराज्य/मुंबई

**विरोधी पक्षाच्या ‘इंडिया’ आघाडीची तिसरी बैठक मुंबई येथे पार पडत आहे. दरम्यान, ‘इंडिया’ने १३ सदस्यांच्या केंद्रीय समन्वय समितीची घोषणा केली. या समितीमध्ये प्रमुख विरोधी पक्षांच्या नेत्यांना स्थान दिलं आहे. या बैठकीतून ‘इंडिया’ आघाडीच्या लोगोचं अनावरण केलं जाणार होतं. मात्र, लोगो अनावरणाचा कार्यक्रम तूर्तास पुढे ढकललं आहे.**




**‘इंडिया’ आघाडीच्या समन्वय समितीत ‘या’ नेत्यांचा समावेश -**
के. सी, वेणुगोपाल (काँग्रेसचे सरचिटणीस), शरद पवार (राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष), एम. के. स्टॅलिन (तामिळनाडूचे मुख्यमंत्री), संजय राऊत (शिवसेना, यूबीटी), तेजस्वी यादव (आरजेडी नेते आणि बिहारचे उपमुख्यमंत्री), अभिषेक बॅनर्जी (तृणमूल काँग्रेसचे सरचिटणीस), राघव चड्ढा (आपचे खासदार), जावेद खान (समाजवादी पक्ष), लालन सिंग (जनता दल युनायटेडचे राष्ट्रीय अध्यक्ष), हेमंत सोरेन (झारखंडचे मुख्यमंत्री), डी. राजा (सीपीआय), ओमर अब्दुल्ला (नॅशनल कॉन्फरन्सचे नेते), मेहबुबा मुफ्ती (पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टीच्या प्रमुख).

मुंबईतील बैठकीतून शुक्रवारी इंडिया’ आघाडीच्या लोगोचं अनावरण होणार होतं. पण सहकारी पक्षाच्या नवीन सूचनांनंतर त्यामध्ये बदल करण्यासाठी लोगोचं अनावरण पुढे ढकलण्यात आलं आहे. इंडिया आघाडीच्या आगामी बैठकीत या लोगोचं अनावरण होण्याची शक्यता आहे.

या बैठकीत २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी (NDA) विरुद्ध लढण्यासाठी सामायिक अजेंडावर निर्णय घेण्याची अपेक्षा आहे.

‘इंडिया’ आघाडीच्या बैठकीला संबोधित करताना काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी भाजपच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारवर ‘सूडाचे राजकारण’ करत असल्याचा आरोप केला. ते म्हणाले की, ‘इंडिया’ची लोकप्रियता वाढत असल्याने सरकार विरोधी पक्षांच्या नेत्यांविरुद्ध तपास यंत्रणांचा दुरुपयोग करेल. देशातील शेतकरी, तरुण, महिला, उपेक्षित, मध्यमवर्ग, विचारवंत, स्वयंसेवी संस्था आणि पत्रकारांसह समाजातील प्रत्येक घटकाला भाजपाच्या हुकूमशाही राजवटीचा फटका बसला आहे.

## अनुमतीशिवाय अधिकाऱ्यांनी दिल्ली सोडू नये

### मोदी सरकारचे आदेश

✔ सुराज्य/नवी दिल्ली



संसदेच्या विशेष अधिवेशनाबाबत मोठी बातमी आहे. अधिवेशन काळात केंद्र सरकारचे सर्व उच्चपदस्थ अधिकारी, सचिव, कॅबिनेट सचिव यांनी दिल्लीत राहणं अपेक्षित आहे. पंतप्रधान कार्यालयाच्या परवानगीशिवाय कोणत्याही विभागाचा सचिव दिल्लीबाहेर जाणार नाही, असे सक्त आदेश केंद्र सरकारनं काढले आहेत.

केंद्र सरकारने १८ ते २२ सप्टेंबर या कालावधीत संसदेचं विशेष अधिवेशन बोलावले आहे. घोषणा झाल्यापासून दिल्लीतील घडामोडींना वेग आला आहे. शुक्रवारी सकाळी एक देश निवडणुकीसाठी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली आहे. त्यानंतर भाजपचे अध्यक्ष जे. पी. नड्डा, रामनाथ कोविंद यांच्या भेटीला गेले. त्यानंतर आता अधिवेशन काळात केंद्र सरकारचे सर्व उच्चपदस्थ अधिकारी, सचिव, कॅबिनेट सचिव यांना दिल्ली न सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

एकापाठोपाठ वेगाने घडणाऱ्या घटना पाहून नेमके अधिवेशन काळात काय घडणार याची उत्सुकता वाढत चालली आहे.

‘वन नेशन, वन इलेक्शन’ संदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी २०१६ पासून भाष्य करत आहे. विशेष अधिवेशन काळात वन नेशन वन इलेक्शन संदर्भात निर्णय होणार का? कारण निवडणूक आयोगाने देखील एक महत्त्वाची घोषणा केली आहे. छत्तीसगड, मध्यप्रदेश, राजस्थान या राज्याच्या विधानसभा निवडणुका त्या डिसेंबर महिन्यातच पार पडणार असल्याची माहिती निवडणूक आयोगाने दिली आहे.

छत्तीसगड, मध्यप्रदेश, राजस्थान विधानसभा निवडणुकांची मुदत डिसेंबरला संपणार आहे. त्यामुळे इतक्या कमी वेळेत निवडणूक शक्य आहे का? भाजपने २००४ साली हा प्रयत्न केला होता त्यावेळी त्यांना याचा फटका बसला होता. आता २० वर्षांनी भाजप पुन्हा प्रयत्न करणार का? मुदतपूर्व निवडणुका होतील का? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहे.

## अजितदादा भाषणाला उभे राहताच फडणवीस निघून गेले



✔ सुराज्य/मुंबई

मुंबईतील वरळी येथे महायुतीच्या तिन्ही पक्षांच्या बैठकीला भाजपासह अजित पवार गट आणि एकनाथ शिंदे गटाचे अनेक आमदार, खासदार, पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ही बैठक सुरू आहे. यावेळी अजित पवार भाषण करायला उभे राहताच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कार्यक्रमातून निघून गेल्याचा प्रकार घडला आहे.

भर कार्यक्रमातून देवेंद्र फडणवीस अचानक उठून गेल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं. मात्र, अजित पवारांच्या भाषणादरम्यान देवेंद्र फडणवीस उठून का गेले? याचं नेमकं कारण समोर आलं आहे. याबाबतचा खुलासा स्वत: फडणवीसांनी केला. अजित पवारांच्या भाषणादरम्यान निघून गेलेले फडणवीस काही मिनिटांनी पुन्हा कार्यक्रमात आले. यानंतर संबंधित कार्यक्रमातून केलेल्या भाषणातून फडणवीसांनी याबाबतचा खुलासा केला.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, ‘मी मगाशी काही कारणांमुळे कार्यक्रमातून उठून गेलो होतो. त्याचं स्पष्टीकरण देतो. कारण अलीकडच्या काळात प्रसारमाध्यमांना जेव्हा बातमी मिळत नाही. तेव्हा ते बातमी तयार करतात. त्यामुळे अजित पवार बोलायला उभे राहिले आणि फडणवीस निघून गेले, अशा प्रकारची बातमी तयार होऊ नये म्हणून मी आधीच स्पष्टीकरण देतो.’ नौदलाचे प्रमुख महाराष्ट्रात आले होते. संरक्षण उत्पादन संदर्भात चर्चा करण्यासाठी आम्ही त्यांना वेळ मागितली होती. नेमकं साडेतीन वाजता त्यांनी वेळ दिला. त्यामुळे मी १५ मिनिटं कार्यक्रम सोडून त्यांची भेट घ्यायला गेलो आणि परत याठिकाणी आलो, असा खुलासा देवेंद्र फडणवीस यांनी केला.

देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, ‘खरं तर, आताच्या परिस्थितीत आपल्या विरोधकांच्या माध्यमातून एकच गोष्ट सुरू आहे. If you can't convince them, confuse them. (जर तुम्ही एखाद्याला पटवून देऊ शकत नसाल, तर त्यांना गोंधळात टाका) याच्या माध्यमातून विसंवाद तयार करण्याचा प्रयत्न केला जात आहे. कुठेतरी वाद आहे, असं दाखवण्याचा प्रयत्न सुरू आहे. पण त्यांनी एक गोष्ट निश्चितपणे समजून घेतली पाहिजे, भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी आणि आमचे सगळे मित्रपक्ष, हे फेव्हिकॉल का जोड आहे.

## भाजपा मंत्र्यांच्या घरात तरुणाची गोळी घालून हत्या

✔ सुराज्य/मुंबई



भारतीय जनता पार्टीचे लखनऊचे खासदार आणि केंद्रीय मंत्री कौशल किशोर यांच्या घरात एका तरुणाचा मृतदेह आढळला आहे. संबंधित तरुणाच्या डोक्याला गोळी लागून मृत्यू झाला आहे. घटनास्थळी खासदार कौशल किशोर यांचा मुलगा विकास किशोर यांची बंदूक आढळली आहे. पोलिसांनी बंदूक जप्त केली असून घटनेचा पुढील तपास केला जात आहे. केंद्रीय मंत्र्याच्या घरात अशाप्रकारची घटना घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

‘पीटीआय’ने दिलेल्या वृत्तानुसार, विनय श्रीवास्तव असं गोळी लागून मृत पावलेल्या तरुणाचं नाव आहे. संबंधित तरुण मंत्री कौशल किशोर यांचा मुलगा विकास किशोर यांचा मित्र असल्याचं समजत आहे. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला आहे.

या प्रकरणाचा अधिक तपास चालू असून फॉरेन्सिक टीम नमुने गोळा करत आहे. सीसीटीव्ही फुटेजची तपासणी देखील करत आहेत.

## ▶▶ क्राईम न्यूज....

### झोपेत सर्पदंश झाल्याने महिलेचा मृत्यू

✔ **सांगली** : रात्री झोपेत असताना सर्पदंश झाल्याने जत तालुक्यातील सिद्धनाथ येथील विवाहित तरुणीचा शुक्रवारी पहाटे मृत्यू झाला. सिद्धनाथ येथील शिंदे वस्तीवर वास्तव्य असलेल्या सुनिता वसंत शिंदे (वय ३०) ही महिला झोपली असताना मध्यरात्री एक वाजण्याच्या सुमारास सर्पदंश झाला. जागी झालेल्या महिलेने ही बाब घरच्या लोकांना सांगितल्याने तिला तत्काळ जतच्या ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. मात्र, उपचार सुरू असताना शुक्रवारी पहाटे तिचा मृत्यू झाला. या प्रकरणी जत पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत झाल्याची नोंद करण्यात आली आहे.

### भावकीच्या वादातून नांदेडमध्ये खून

✔ **नांदेड** : जुन्या वादातून एका वृद्धाचा खून करणाऱ्या मारेकऱ्यांना कंधार न्यायालयाने शिक्षा सुनावली आहे. विशेष म्हणजे ज्या दिवशी वृद्धाचा खून करण्यात आला होता, त्या दिवशी रक्षाबंधन सण होता. तब्बल पाच वर्षानंतर न्यायालयाने ज्या दिवशी आरोपींना शिक्षा सुनावली, तो दिवसही योगायोगाने रक्षाबंधनाचाच निघाला. न्यायाधीश माधुरी आनंद यांनी आरोपींना शिक्षा सुनावली आहे. २६ ऑगस्ट २०१८ रोजी ही घटना घडली होती.

### शिवसेना पदाधिकाऱ्याची पैशांच्या वादातून हत्या

✔ **ठाणे** : पैशांच्या परतफेडीवरून झालेल्या वादातून एका तरुणाची हत्या करण्यात आली. नंतर त्याचा मृतदेह पेट्रोल टाकून जाळण्याचा प्रयत्न झाला. हा धक्कादायक प्रकार ठाण्यात घडला असून, या हत्येप्रकरणी चितळसर पोलिसांनी तिघांना अटक केली आहे. अक्षय ठुबे (वय २५) असे या तरुणाचे नाव असून, तो शिवसेनेच्या शिंदे गटाचा पदाधिकारी (उपशाखाप्रमुख) असल्याचे सांगितले जात आहे. आरोपींनी त्याच्या अंगावरील सोन्याचे दागिने आणि मोबाइल काढून घेतल्याची बाबही समोर आली आहे. या घटनेनंतर ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत गुन्हेगारीने कळस गाठला असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

### महिलेची मुलीसोबत उडी घेऊन आत्महत्या

✔ **ठाणे** : घोडबंदर येथील कासारवडवली भागात शुक्रवारी मध्यरात्री प्रियंका मोहिते (२६) हिने तिच्या एक वर्षीय मुलीसोबत सहाव्या मजल्यावरून खाली उडी मारून आत्महत्या केल्याची घटना घडली. याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली.

## मणिपूरमधील हिंसाचार थांबेना; ८ जणांचा मृत्यू

✔ सुराज्य/मणिपूर

मागील जवळपास चार महिन्यांपासून ईशान्य भारतातील राज्य मणिपूरमध्ये जातीय हिंसाचार उफाळला आहे. आतापर्यंत या हिंसाचारात १६० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. गुरुवारीही (३१ ऑगस्ट) मणिपूरमधील काही भागात हिंसाचाराच्या घटना घडल्या आहेत. २९ ऑगस्टपासून कुकी आणि मैतेई समुदायात सुरू असलेल्या हिंसाचारात बिष्णुपूर आणि चुरचंदपूर जिल्ह्यात किमान आठ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. तर एकूण १८ जण जखमी झाले आहेत.

मुख्यमंत्री एन बीरेन सिंह यांनीही मणिपूरमधील परिस्थिती गंभीर असल्याचं म्हटलं आहे. दोन्ही समुदायातील लोकांनी शांतता राखावी, असं आवाहनही त्यांनी केलं आहे. या घटनेत आठ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे.

## मोदींच्या धक्कातंत्रामुळे ‘इंडिया’मध्ये गोंधळ

✔ सुराज्य/नवी दिल्ली




देशात लोकसभेसह सर्व राज्यांतील विधानसभेच्या निवडणुका एकाचवेळी घेण्यासंदर्भात केंद्र सरकारने चाचपणी सुरू केली आहे.

माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समिती नेमली असून त्यासंदर्भात अधिसूचनाही काढली जाईल. केंद्राचा हा संभाव्य निर्णय तातडीने लागू होण्याची शक्यता नसली तरी, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या धक्कातंत्रामुळे विरोधकांच्या ‘इंडिया’मध्ये धांदल उडवून देण्यात भाजप यशस्वी झाली आहे.

केंद्र सरकारने १८ ते २२ सप्टेंबर या पाच दिवसांमध्ये संसदेचे विशेष अधिवेशन बोलावले असल्याने ‘एक देश, एक निवडणूक’, महिला आरक्षण तसेच, समान नागरी संहिता अशी भाजपच्या राजकीय कार्यक्रमपत्रिकेवरील विधेयके मांडली जाणार असल्याची चर्चा होत आहे. ही तीनही विधेयके विशेष अधिवेशनामध्ये संमत होतीलच असे नाही. मात्र, ती संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये मांडली गेली तरी भाजपच्या मतदारांना योग्य राजकीय संदेश पोहोचवला जाऊ शकतो. शिवाय, विरोधकांच्या ‘इंडिया’च्या राजकीय डावपेच आणि समीकरणांना शह दिला जाऊ शकतो, असा सूर भाजपमधून उमटू लागला आहे. वास्तविक केंद्रीय संसदीय कामकाजमंत्री प्रल्हाद जोशी यांनी केलेली विशेष अधिवेशनाची घोषणा भाजपच्या नेत्यांनाही आश्चर्याचा धक्का होता.

## सर्व निवडणुका एकाच वेळी होणार?

### ▶▶ मोदी सरकारचा मोठा निर्णय ▶▶ माजी राष्ट्रपतींवर सोपवली मोठी जबाबदारी

✔ सुराज्य/नवी दिल्ली



गेल्या काही वर्षांपासून देशात सर्व निवडणुका एकत्र घेण्यासंदर्भात चर्चा होत असल्याचं दिसून आलं आहे. ‘एक देश, एक निवडणूक’ या मुद्द्याचं खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी सातत्याने समर्थन करताना दिसले आहेत. त्यामुळे यासंदर्भात अनेक पातळ्यांवर चर्चा होत होती. मात्र, आता केंद्र सरकारने यासंदर्भात एक मोठा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता ‘एक देश, एक निवडणूक’ ही चर्चा वास्तवात उतरण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

यासंदर्भात एकीकडे विरोधक केंद्र सरकारच्या निर्णयावर टीका करत असले, तरी केंद्र सरकारने आपली भूमिका स्पष्ट केल्याचं पाहायला मिळत आहे.

केंद्र सरकारनं गुरुवारी यासंदर्भात एक निर्णय जाहीर केला असून त्यानुसार माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली एका उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली आहे.

‘एक देश, एक निवडणूक’ हे तत्व देशात प्रत्यक्षात अंमलात येऊ शकतं का? असल्यास त्यासाठी कोणत्या तरतुदी, उपाययोजना कराव्या लागतील यासंदर्भात आढावा घेऊन शिफारशी करण्याची जबाबदारी या समितीकडे सोपवण्यात आली आहे.

खुद्द माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्याच अध्यक्षतेखाली ही समिती गठित करण्यात आली असल्यामुळे ‘एक देश, एक निवडणूक’ योजनेसाठी केंद्र सरकार आग्रही असल्याचं स्पष्ट झालं आहे.

मात्र, दुसरीकडे विरोधकांकडून यावर तीव्र आक्षेप घेण्यात आला आहे. सर्व पक्षांना व देशाच्या संसदेला विश्वासात घेतल्याशिवाय केंद्र सरकार असा निर्णय कसा घेऊ शकते? असा सवाल विरोधकांकडून केला जात आहे. तसेच, वन नेशन, वन इलेक्शनच्या आधी देशात फेअर (न्याय्य) इलेक्शन घ्या’ अशी टीकाही विरोधक करताना दिसत आहेत.

## महामार्गावर भीषण अपघात, बाईकस्वाराचा दुर्दैवी अंत

✔ सुराज्य/पुणे

पुणे सोलापूर महामार्गावरील उरुळी कांचन ग्रामपंचायतच्या हद्दीत कंटेनर आणि दुचाकीचा भीषण अपघात झाला. या अपघातात २३ वर्षीय बाईकस्वाराचा जागीच मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. एलाईट चौक परिसरात १ सप्टेंबर रोजी स. आठ वा. च्या सुमारास हा अपघात झाला.

शुभम रमेश लेचरूड, (वय-२३, रा. डाळिंब ता. दौंड) असे अपघातात मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शुभम हा आपल्या दुचाकीवरून घरी डाळिंब या ठिकाणी निघाला होता. यावेळी भरधाव आलेल्या कंटेनर चालकाने शुभम चालवीत असलेल्या दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली. अपघात एवढा भीषण होता की, यामध्ये शुभम याच्या डोक्याला जबर मार लागला होता. त्याला तात्काळ उरुळी कांचन येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी उपचारापूर्वीच त्याचे निधन झाल्याची माहिती दिली.

## मंत्रालय उडवून देण्याची धमकी

### स्पर्धा परीक्षेची तयारी करणारा विद्यार्थी ताब्यात

✔ **अहमदनगर** : गुरुवारी दुपारी मंत्रालय बॉम्बने उडवून देण्याची धमकी देणारा फोन पोलिसांकडे आल्याने मोठी खळबळ उडाली होती. पोलिसांनी फोन करणाऱ्याचा शोध घेतला असून त्याला अहमदनगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यातून ताब्यात घेण्यात आले. विशेष म्हणजे तो स्पर्धा परीक्षेची तयारी करणारा विद्यार्थी असून परीक्षेसंबंधी सूचना करण्यासाठी त्याला मुख्यमंत्र्यांशी बोलायचे होते. मात्र, संपर्क करून दिला जात नसल्याने त्याने हे कृत्य केल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आले आहे. फोन केला तेव्हा त्याने मद्यपान केलेले होते का? याची चौकशी सुरू आहे.



बाळकृष्ण भाऊसाहेब ढाकणे (वय ३४ रा. हसनापूर, ता. शेवगाव) असे त्याचे नाव आहे. गुरुवारी पोलिसांच्या ११२ या हेल्पलाईन क्रमांकावर फोन आला. फोन करणाऱ्याने आपले नाव न सांगता मला मुख्यमंत्र्यांशी बोलू द्या, अन्यथा मंत्रालय बॉम्बने उडवून देऊ, अशी धमकी त्याने दिली. यामुळे खळबळ उडाली. ही माहिती मंत्रालयाचा सुरक्षा विभाग आणि मुंबई पोलिसांना कळविण्यात आली. त्यांनी मंत्रालयात तपासणी करून सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला. तोपर्यंत हा फोन नगर जिल्ह्यातून आल्याचे आढळून आल्याने फोन करणाऱ्या व्यक्तीला शोधण्याची जबाबदारी नगर पोलिसांवर सोपविण्यात आली. पोलिसांनी तातडीने हसनापूर गाठले. तेथून फोन करणाऱ्या बाळकृष्ण भाऊसाहेब ढाकणे याला ताब्यात घेतले. प्राथमिक चौकशीत तो स्पर्धा परीक्षेची तयारी करीत असल्याचे आढळून आले.

## पाठ्यपुस्तके मराठीत करण्यासाठी विद्यापीठांना सप्टेंबरपर्यंतची मुदत




✔ सुराज्य/पुणे

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात मातृभाषेतून शिक्षणाचा आग्रह धरण्यात आला आहे. मात्र, उच्च शिक्षणात विद्यापीठांकडून विविध विद्याशाखांतील पाठ्यपुस्तकांचे मराठीत भाषांतर करण्याबाबत काहीच हालचाली करण्यात आल्या नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे आता विद्यापीठांना सर्व पाठ्यपुस्तकांचे मराठीत भाषांतर करण्यासाठी सप्टेंबरपर्यंतची मुदत देण्यात आली आहे.

उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी या संदर्भातील निर्देश परिपत्रकाद्वारे दिले. राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना मातृभाषेतून शिक्षण मिळण्यासाठी अनुषंगाने राज्यातील तंत्रनिकेतनांमध्ये मराठीतून अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच अभियांत्रिकी विद्याशाखेची पाठ्यपुस्तके मराठीत करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर विद्यापीठ स्तरावरील इंग्रजी भाषेत असलेली पाठ्यपुस्तके मराठीतून उपलब्ध करण्याबाबत झालेल्या ऑनलाइन बैठकीत राज्यातील विद्यापीठांकडून पाठ्यपुस्तकांच्या भाषांतराबाबत अद्याप काहीच तयारी करण्यात आली नसल्याचे समोर आले. त्यामुळे आता विद्यापीठांना पाठ्यपुस्तकांच्या भाषांतरासाठी वेळापत्रकच निश्चित करून देण्यात आले आहे.

उच्च शिक्षण विभागाने पाठ्यपुस्तकांच्या भाषांतरासाठी आयआयटी मुंबईसह सामंजस्य करार केला आहे. त्यानुसार पाठ्यपुस्तकांच्या भाषांतराबाबत निर्देश देण्यात आले होते. मात्र, शैक्षणिक वर्ष सुरू होऊनही विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम मराठीत उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. त्यामुळे आता पाठ्यपुस्तकांच्या मराठी भाषांतराचे काम युद्धपातळीवर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार आयआयटी मुंबईच्या सहकार्याने प्रत्येक विद्यापीठाने पुढील दोन आठवड्यात वाणिज्य आणि विज्ञान विद्याशाखेतील किमान दहा पुस्तकांचे भाषांतर पूर्ण करून घेणे आवश्यक आहे. तर उर्वरित सर्व पुस्तके सप्टेंबर अखेरपर्यंत भाषांतरित करून घेण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

# महापालिका तिजोरीत कर स्वरूपात १०२ कोटी जमा

सुराज्य/सोलापूर

**सोलापूर शहरात एकूण २ लाख ४७ हजार ९७४ मिळकती आहेत. शहरातील एकूण मिळकतदारांपैकी सुमारे १ लाख ८६ हजार १२५ मिळकतींना बिलांचे वाटप झाले आहे नळ आकारणीसह नव्या मिळकत करवाढीनुसार चालू सन- २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी मागीलसह ३०८ कोटींच्या वसुलीचे उद्दिष्ट मालमत्ता विभागाला देण्यात आले आहे. आतापर्यंत महापालिकेने सुमारे १०२ कोटींची वसुली केली आहे. उद्दिष्टपूर्ण करण्यासाठी महापालिकेला अथक परिश्रम घ्यावे लागणार आहेत.**

## चालू वर्षात ३०८ कोटींचे उद्दिष्ट

## अभय योजना सुरू होणार नाही : आयुक्त

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील मिळकत करामध्ये ५ टक्के व ऑनलाईन भरल्यास ६ टक्के देण्यात येणारी सवलत दि.३१ ऑगस्ट रोजी संपली आहे. मिळकतदारांना मुदतीत बिल भरल्यास चालू आर्थिक वर्षाच्या कराच्या बिलावर ५ टक्के व ऑनलाईन भरल्यास जादा १ टक्के अतिरिक्त सूट देण्यात आलेली होती. त्यानुसार शहर व हद्दवाढ मधील नागरीकांनी ३१ ऑगस्ट अखेर पर्यंत ७४ हजार ८३१ मिळकतदारांनी कर रूपात १०२कोटी २७ लाखांची रक्कम भरली आहे.

दरम्यान, मुदती संपल्यानंतर आता थकीत रकमेवर व पहिल्या सहामाहीच्या बिलावर दरमहा २ टक्के दंडाची आकारणी लावण्यात येणार आहे. जे मिळकतदार थकबाकीसह चालू वर्षाचा कर भरणार नाहीत अशा मिळकतदारांच्या मालमत्तांची अटकवाणी (सिल) करणे, बोजा चढवणे तसेच खुल्या मिळकतीचा जाहिर लिलाव करण्याची कार्यवाही महापालिका हाती घेणार आहे. शहर हद्दीमधील विविध व्यावसायिक आस्थापनाची थकबाकी मोठया



प्रमाणावर असून त्यांनी त्यांच्या मिळकत कराची थकबाकी सत्वर भरून घ्यावी, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे. यापुढे महानगरपालिका थकबाकीवर लावण्यात आलेल्या शास्तीबाबत कोणतीही सवलत देणार नाही अथवा अभय योजना राबविणार नाही, असे महापालिका आयुक्त शितल तेली उगले यांनी सांगितले.

### ७४ हजारांपेक्षा जास्त मिळकतदारांनी घेतली सवलत

मुदतीत मिळकत कर भरणाच्या मिळकतदारांची संख्या ७४ हजार ८३१ इतकी आहे. त्यापैकी ऑनलाईन पध्दतीने मिळकत कर भरलेले एकूण २८ हजार ९७५ मिळकतदारांनी ऑनलाईन सवलतीचा लाभ घेतलेला आहे. मुदतीत मिळकत कर भरुन महानगरपालिकेस सहाकार्य केल्याबद्दल सदर मिळकतदारांचे आभार मानले आहे.

### कर न भरल्यास ही होणार कारवाई

आस्थापनांची अटकावणी (सिल) करणे, मिळकतीचा जाहीर लिलाव करणे, पाणी पुरवठा खंडीत करणे मिळकतीमधील काही भाग सिल करणे, थकबाकी असलेल्या सर्व मिळकतदारांची यादी जाहीर करणे आदी कारवाई महापालिकेकडून होण्याची शक्यता आहे.



**सोलापुरातील गणेश मूर्तींना महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक आदी प्रांतातून मागणी असते. मूर्ती हैद्राबाद, सिकंदराबाद, चेन्नई, बंगळुरू आदी महानगरांकडे प्रस्थान ठेवण्यासाठी तयार झाल्या आहेत. शुक्रवारी सोलापूर रेल्वे स्टेशनवरून त्या रवाना झाल्या.**

## राज्य परिवहन महामंडळाचा उपक्रम

# श्रावणमासानिमित्त चला लालपरीसोबत देवदर्शनाला

सुराज्य/सोलापूर

श्रावण महिन्याच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने श्रावणमास लालपरीसोबत हा उपक्रम हाती घेतला आहे. जिल्ह्यातील प्रवाशांना लालपरीतून देवदर्शनासाठी मंगळवेढा, कुर्डुवाडी, अकलूज व पंढरपूर आगारातून विशेष बससेवा सुरु करण्यात आली आहे.



कमी तिकीट दरात श्रावण महिन्यात भाविकांना वेगवेगळ्या जिल्ह्यातील देवदर्शनाची सोय परिवहन महामंडळाने उपलब्ध करून दिली आहे. तसेच महिला बचत गटाने देखील बसची मागणी केल्यास त्यांनाही गावातूनच बस उपलब्ध करून दिली जाणार आहे. जेवणाचा खर्च मात्र प्रवाशांनाच करावा लागणार आहे. हा उपक्रम श्रावण महिन्यापर्यंतच सुरु राहणार आहे, असे विभाग नियंत्रक विनोद भालेराव यांनी सांगितले आहे.

१२ ज्योतिर्लिंगापैकी परळी वैजनाथ, येरमाळा व तुळजापूर दर्शनासाठी पूर्ण तिकीट ७७५ तर अर्धे तिकीट ३९० रुपयांचे मोजावे लागणार आहेत. मंगळवेढा, पंढरपूर, अक्कलकोट, तुळजापूर, सोलापूर व माचणूर दर्शनासाठी पूर्ण तिकीट ४९५ तर अर्धे तिकीट २५० रुपये आकारले जाणार आहेत. मंगळवेढा, शिंगणापूर, गोंदवले, म्हसवड, पंढरपूर दर्शनासाठी पूर्ण तिकीट ३७० तर अर्धे तिकीट १९० रुपये द्यावे लागणार आहेत. दोन मुक्कामासह (ओझर व पाली येथे) मंगळवेढा ते अष्टविनायक दर्शनाकरिता पूर्ण तिकीट १६२० तर अर्धे तिकीट ८१५ रुपये असणार आहे.

अकलूज, पंढरपूर, अक्कलकोट, गाणगापूर आणि अकलूज, पंढरपूर, अक्कलकोट, सोलापूर, गाणगापूर या प्रवासासाठी पूर्ण तिकीट ८०० रुपये तर अर्धे तिकीट ४०० रुपये असणार आहे. अकलूज, कोल्हापूर, कन्हेरीमठ आणि अकलूज, बार्शी, परळी वैजनाथ या प्रवासासाठी प्रवाशांना प्रत्येकी ८८० रुपये पूर्ण तिकीट तर अर्धे तिकीट ४४० रुपये असणार आहे.

अकलूज, म्हसवड, गोंदवले, औंध व गाणपूर या प्रवासासाठी पूर्ण तिकीट ६६० रुपये आणि अर्धे तिकीट ३३० रुपये असणार आहे. १२ ज्योतिर्लिंगापैकी परळी वैजनाथ दर्शन व पंढरपूर श्री विठ्ठल व शिंगणापूर महादेव दर्शनाची सोय लालपरीने उपलब्ध करून दिली आहे. दरम्यान, परळी वैजनाथ येथे जाऊन येण्यासाठी प्रत्येक प्रवाशाला पूर्ण तिकीट ५२० रुपये तर अर्धे तिकीट २६० रुपये असणार आहे. तसेच पंढरपूर, शिंगणापूरसाठी पूर्ण तिकीट २४० रुपये तर अर्धे तिकीट १२० रुपये आकारले जाणार आहेत.

# उचेठाणच्या वाळू उपशाला ग्रामस्थांचा विरोध

सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्ह्यात पाच ठिकाणी सुरु झालेल्या वाळू डेपोतील तीन डेपो बंद झाले आहेत. उचेठाण येथील ग्रामस्थांनी ठेकेदाराला वाळू वाहतुकीसाठी रस्ता वापरण्यास विरोध केला आहे. यामुळे सध्या दोनच ठिकाणी वाळू विक्री सुरू आहे.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी राज्यात नवे वाळू धोरण लागू केले. सहाशे रुपये ब्रास या दराने सर्वसामन्यांना वाळू उपलब्ध व्हावी यासाठी सहा महिने वाट पाहून जून महिन्यात पाच ठिकाणी वाळू डेपो सुरू झाले. यामध्ये चळे (ता. पंढरपूर), उचेठाण (ता. मंगळवेढा), जांभूड, उंबरे-वेळापूर, वाफेगाव (ता. माळशिरस) या पाच ठिकाणी वाळू डेपो सुरू झाले होते. मात्र, सध्या चळे व जांभूड या दोनच ठिकाणी वाळू उपसा सुरू आहे. उचेठाण येथे वाळू उत्खनन व डेपो यामध्ये सुमारे एक किलोमीटरपेक्षा अधिक अंतर आहे. ठेकेदाराच्या वाहनांमुळे रस्ता खराब होतो, असा ग्रामस्थांनी आरोप केला आहे. या रस्त्याची दुरुस्ती आम्ही स्वत: मुरूम टाकून केली आहे, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. यामुळे येथील ग्रामस्थ वाळू उपसा करण्यास विरोध करत आहेत. याठिकाणी मंडलाधिकारी व तहसीलदार यांनी भेट देऊन प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला तरीही ग्रामस्थांचे समाधान झाले नसून जिल्हाधिकारी गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयात येऊन ग्रामस्थांनी निवेदन दिले आहे.

नव्याने ३० वाळू घाटांवर वाळू डेपो सुरू करण्याचा प्रस्ताव आहे. मात्र या ठिकाणी डेपो सुरू होण्यासाठी ऑक्टोबरपर्यंत वेळ जाऊ शकतो. नैसर्गिक आपत्ती असलेल्या ठिकाणीच वाळू उपसा करण्यास परवानगी दिली जात आहे. प्रस्तावित वाळू घाटाचा जिल्हा सर्व्हे होणे, जनसुनावणी होणे त्यानंतर पर्यावरण विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र मिळविणे हे टप्पे पार पाडल्यानंतरच नव्या वाळू घाटांना मंजुरी मिळू शकते. ही सर्व प्रक्रिया होण्यासाठी ऑक्टोबरअखेरपर्यंत कालावधी लागण्याची शक्यता आहे.

# औज घटनेला जबाबदार कोण? : कारंडे यांचा सवाल

सुराज्य/सोलापूर

औज येथे घडलेली घटना खूप मोठी दुर्दैवी आहे. या घटना अनेक वेळा घडलेल्या आहेत. असे असताना देखील येथील तालुक्याच्या लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे व अकार्यक्षमतेमुळे अशा घटना वारंवार घडत आहेत. या भागातील रस्त्यांची अवस्था दयनी झालेली आहे. या रस्त्याच्या संदर्भात दक्षिण तालुक्यामध्ये अनेक वेळा रास्ता रोको झाले. विविध आंदोलने झाली पण हे रस्ते काय होऊ शकले नाहीत, यास जबाबदार कोण? असा सवाल धनगर आरक्षण कृती समिती सदस्य अमोल बापू कारंडे यांनी केला आहे.

या भागामध्ये खूप मोठी इंडस्ट्रियल असल्यामुळे तीन सिमेंट फॅक्टरी एक एनटीपीसी दोन साखर कारखाने असल्याने या भागात खूप मोठी जड वाहतूक रात्रंदिवस चालू असते.

या भागात रस्ते सिंगल असल्यामुळे असे अपघात वारंवार होतात. भागातील रस्ते तात्काळ रुंदीकरण झाले पाहिजे चार पदरी रस्ते झाले पाहिजे तरच या भागातील अपघाताचे प्रमाण कमी होईल त्यामुळे आता या भागातील नागरिकांना जन आंदोलन उभे करण्याची वेळ आलेली आहे, असे कारंडे यांनी म्हटले आहे.



### राहुल गांधींच्या सत्काराला सोलापुरातील नेत्यांची उपस्थिती

**सोलापूर :** काँग्रेसचे राष्ट्रीय नेते राहुल गांधी इंडिया बैठकीनिमित्त मुंबईला आले आहेत. त्यांचासत्कार सोहळा टिळक भवन मुंबई येथे आयोजित केला होता. या कार्यक्रमाला सोलापुरातील काँग्रेसच्या नेते आणि पदाधिकाऱ्यांनी उपस्थिती दर्शवली. या कार्यक्रमास राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, प्रदेश अध्यक्ष नानाभाऊ पटोले, अखिल भारतीय काँग्रेस कमिटी वर्किंग सदस्य प्रणितीताई शिंदे यांच्यासह राज्यातील प्रमुख नेते मंडळी सह पदाधिकारी उपस्थित होते. सोलापुरातून शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे, माजी आमदार प्रकाश यलगुलवार, जिल्हा काँग्रेसचे कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे, माजी नगरसेवक मनोज यलगुलवार, महिला अध्यक्ष प्रमिलाताई तुपलवंडे, प्रदेश चिटणीस नरसिंह आसादे, अँड मनीष गडदे, तिरुपती परकीपंडला आदी उपस्थित होते.

### किरकोळ कारणावरून मारहाण; चौघांवर गुन्हा

**सोलापूर :** किरकोळ कारणावरून तरुणास लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना २८ ऑगस्ट रोजी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास अजंठा बिअर शॉपी म्हेत्रे वस्ती येथे घडली.कुमार कांबळे, अनिल माने,आदित्य प्रकाळे,समर्थ जानराव-माने असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. शेखर अशोक मोरे (वय-२८,महाराणा प्रताप नगर) हे दारू पिण्यासाठी गेले असता,त्यांना विनाकारण कुमार कांबळे व अनिल माने यांनी मारहाण केली.तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल चव्हाण हे करीत आहेत.

## मरवडे पंचक्रोशीत रक्षाबंधन

# महिलांनी अभिजीत पाटलांना भाऊराया म्हणत बांधल्या राख्या

सुराज्य/पंढरपूर

विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजित पाटील व मित्र परिवाराच्या वतीने मरवडे पंचायत समिती, गटातील शेकडो महिलांनी राख्या बांधून रक्षाबंधन सण साजरा केला.

पंचक्रोशीतील सर्व महिलांच्या उपस्थित रक्षाबंधन सोहळा लतिफभाई मंगल कार्यालय, मरवडे येथे पार पडला. यावेळी कविता पवार, सविता जाधव, निकीता पवार, सुनिता राठोड, सारिका केंगार, अर्चना चव्हाण, मोहीनी केंगार, लक्ष्मी सुतार, सुनिता सोनवणे, यांच्यासह



शेकडो महिलांनी अभिजीत पाटील यांना राखी बांधली.

कार्यक्रमाच्या प्रसंगी महिलांनी, शालेय विद्यार्थ्यांनी, वयोवृध्द मातांनी अभिजित पाटील यांना राखी बांधून ओवाळणी केली. अभिजीत पाटील यांच्या वतीने महिलांना भाऊरायांची साडी वाटप करण्यात आली.

अभिजीत पाटील म्हणाले की, महिलांनी आता उद्योजक व्हावे, यामध्ये शासनाकडूनही अनेक सुविधा उपलब्ध करून देऊ. रोजगार निर्मिती होण्यासाठी बचत गटाच्या माध्यमातून अनेक गट निर्माण करावे, शिलाई मशिनची आवड असणाऱ्या महिलांसाठी विठ्ठल कारखान्याच्या गारमेंटच्या वतीने सहकार्य करण्यात येईल. आपला भाऊ या नात्याने येणाऱ्या कोणत्याही अडचणीच्या काळात साथ देण्यासाठी कटीबध्द आहे. यावेळी भाळवणी, डिकसळ, बालाजीनगर, मरवडे, कागस्ट, कात्राळ, कर्जाळ, फटेवाडी, हिवरगाव, हाजापूर, हिवरगाव, खोमनाळ, तळसंगी, भालेवाडी, डोणज, येड्राव सिद्धकनेरी आदी पंचक्रोशीतील अनेक महिलांभगिनी उपस्थित होत्या.

# महास्वामींच्या बनावट जातप्रमाणपत्राची चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याची बदली

सुराज्य/सोलापूर

भारतीय जनता पक्षाचे खासदार डॉ. जयसिध्देश्वर महास्वामी यांच्या बनावट जात प्रमाणपत्राचा तपास करणाऱ्या सोलापूर जात प्रमाणपत्र समितीचे अध्यक्ष ज्ञानदेव सूळ यांची मंत्रालयात बदली करण्यात आली आहे. या प्रकरणात सूळ यांनी दक्षता पथकाला खासदार महास्वामी यांच्या मूळ गावापर्यंत चौकशीसाठी पाठवले होते. या प्रकरणात तपास अधिकारी सूळ यांची निर्णायक भूमिका असताना त्यांचीच बदली करण्यात आल्याने चर्चेला उधाण आले आहे.

डॉ. जयसिध्देश्वर महास्वामी हे २०१९ मध्ये भाजपच्या तिकिटावर सोलापुरातून निवडून आले आहेत. मात्र, त्यांचे जात प्रमाणपत्र खोटे असल्याची तक्रार दाखल झाली होती. त्याचा तपास सोलापूर जात प्रमाणपत्र समितीचे अध्यक्ष ज्ञानदेव सूळ यांच्याकडे होता. या प्रकरणात सूळ यांनी महत्वपूर्ण भूमिका निभावली होती. खासदार महास्वामी यांच्या मूळगावापर्यंत दक्षता समितीला सूळ यांनी पाठवले होते. पथकाने त्या ठिकाणी जाऊन कागदपत्रांची पडताळणी केली होती, त्यानंतर खासदारांचे जात प्रमाणपत्र बनावट असल्याचा निकाल दिला होता.

ज्ञानदेव सूळ यांच्या निकालावर खासदार महास्वामी यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. दरम्यान, या प्रकरणात समितीच्या अध्यक्षांनी स्वतः लक्ष घालून फेरकार्यवाही सुरू केली होती. त्याचदरम्यान त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी ३० ऑगस्ट रोजी संपणार असल्याने आपल्याला मुदतवाढ मिळावी, अशी मागणी सूळ यांनी केली होती. मात्र, त्यांची मागणी विचारात न घेता ३१ ऑगस्ट रोजी स्वतंत्र आदेश काढून त्यांना सामान्य प्रशासन विभागात रुजू होण्याचा आदेश दिला आहे.

### बी. जी. पवार यांच्याकडे तात्पुरता पदभार

ज्ञानदेव सूळ यांना मंत्रालयात पुन्हा रुजू होण्याचे आदेश आल्याने सोलापूर जात प्रमाणपत पडताळणी समितीचे अध्यक्षपद रिक्त झाले आहे. मात्र, नवा अध्यक्ष नेमण्यात येईपर्यंत धाराशिव समितीचे अध्यक्ष बी. जी. पवार यांच्याकडे सोलापूरचा पदभार तात्पुरत्या स्वरूपात सोपविण्यात आलेला आहे, असे आदेशात म्हटलेले आहे.

# लोकसभेच्या निवडणुकीच्या तयारीला लागा : धोत्रे

सुराज्य/सोलापूर

## मनसे सोलापूर लोकसभा मतदारसंघातील पदाधिकाऱ्यांची बैठक

महाराष्ट्रातील जनता सत्ताधारी आणि विरोधी अशा सर्वच पक्षावर संताप व्यक्त करत असून या कोणत्याही पक्षावर महाराष्ट्रातील जनतेचा विश्वास राहिलेला नाही. त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीमध्ये महाराष्ट्रातील जनता निश्चितपणे राज ठाकरे यांच्यावर विश्वास ठेवून मनसेच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतील. त्यामुळे पदाधिकाऱ्यांना आता सोलापूर लोकसभेच्या तयारीला लागावे, असे आवाहन मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी केले.

सोलापूर लोकसभा मतदारसंघातील सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक शहरातील मनसेच्या सोन्या मारुती चौक येथील मध्यवर्ती कार्यालय मध्ये पार पडली, त्यावेळी धोत्रे बोलत होते. यावेळी पंढरपूर मंगळवेढा, अक्कलकोट,



मोहोळ, सोलापूर शहर उत्तर, सोलापूर शहर मध्य, सोलापूर शहर दक्षिण तालुका, या सहा विधानसभा मतदारसंघाच्या प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

सध्या महाराष्ट्रामध्ये राजकारणामध्ये जो चिखल झालाय ते सर्व पाहून जनता कंटाळी असून फक्त राज ठाकरे हेच जनतेसाठी महाराष्ट्रामध्ये काम करत आहेत. महाराष्ट्रातील सर्व जनतेचे राज ठाकरे सोडवत असतात. त्यामुळे जनतेला न्याय देण्यासाठी येणाऱ्या निवडणुकीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी जोमाने तयारीला लागावे असे आवाहन धोत्रे यांनी केले.

यावेळी जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर, जिल्हाध्यक्ष प्रशांत गिड्डे, लोकसभा अध्यक्ष प्रशांत इंगळे, शहराध्यक्ष जैनुद्दीन शेख, विद्यार्थी सेनेचे राज्य उपाध्यक्ष अमर कुलकर्णी, विद्यार्थी सेनेचे जिल्हाध्यक्ष अभि रंपुरे, उपाध्यक्ष सत्तार सय्यद, महिला आघाडी शहराध्यक्ष जयश्री हिरेमठ, शोभा साठे, चंद्रकांत पवार, देवदत्त पवार, राजवीर हजारे कैलास खडके, शाहूराजे देशमुख, शशिकांत पाटील, अनिल बागल, प्रदीप प्रचंडे, मल्लिनाथ पाटील, नागेश कुंभार, शिंदे बाळासाहेब सरवदे, गोविंद बंदपट्टे, महादेव मांढरे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.